cmyk

## संपादकीय

### सेमिकंडक्टर मिशन २.० : घोषणांपेक्षा उत्तरदायित्वाची गरज

भारताने सेमिकंडक्टर उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकत २.० साठी सुमारे ₹१.२७ लाख कोटींच्या तरतुदीची घोषणा केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ५, संरक्षण, इलेक्ट्रिक वाहने, डेटा सेंटर्स आणि डिजिटल अर्थव्यवस्थेच्या वेगवान विस्ताराच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय दूरदृष्टीचा मानावा लागेल. कारण भविष्यातील आर्थिक आणि सामरिक महासत्ता होण्याचा मार्ग सेमिकंडक्टर तंत्रज्ञानातूनच जातो. मात्र, या महत्त्वाकांक्षी घोषणेइतकाच महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पहिल्या टप्प्याचा नेमका लेखाजोखा काय?

दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१२० | सोमवार दि.२० जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### सोलापुरातून 'किसान रेल्वे' पुन्हा सुरू करण्याचा निर्णय

सोलीपूर : सोलापूर जिल्ह्यातील शेतीमाल देशातील प्रमुख बाजारपेठांपर्यंत जलद व सुरक्षितरीत्या पोहोचविण्यासाठी मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने पुन्हा 'किसान रेल्वे' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे शेतीमालाच्या रेल्वे वाहतुकीला गती मिळण्याबरोबरच शेतकऱ्यांना आणि कृषी प्रक्रिया उद्योगांना मोठा दिलासा मिळणार असल्याचा दावा मध्य रेल्वेकडून करण्यात आला आहे. मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात आयोजित विशेष बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीला विभागीय रेल्वे व्यवस्थापक सुजित मिश्रा, वरिष्ठ अधिकारी दिग्विजय, अतुल लोकरे तसेच नगरसेवक प्रियदर्शन साठे, भीमा वाघमारे आणि मिलिंद ठोंबरे उपस्थित होते. बैठकीत जिल्ह्यातील रेल्वेसंबंधित प्रलंबित प्रश्न, शेतकरी व उद्योजकांच्या सुविधा, तसेच वारकऱ्यांच्या सोईसुविधांवर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील साखर कारखान्यांत उत्पादित होणारे इथेनॉल आणि गुळाची रेल्वेमार्गे वाहतूक करण्यासाठी स्वतंत्र आराखडा तयार करण्याचाही निर्णय घेण्यात आला. यामुळे वाहतूक खर्चात बचत होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

### ९ वर्षांच्या चिमुरडीचा विनयभंग;संशयीताची हत्या

हैदराबाद : भाग्यनगर (हैदराबाद) येथील जिआगुडा भागात ९ वर्षीय चिमुरडीचा विनयभंग केल्याच्या संशयावरून संतप्त जमावाने एका चहा विक्रेत्याची बेदम मारहाण करून हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कुलसूमपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागच्या आठवड्या ही घटना घडली. अब्दुल अझीझ (वय ५० वर्षे) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अब्दुल अझीझ हा चहा विक्रीचा व्यवसाय करत होता. तो चॉकलेटचे आमिष दाखवून एका चिमुरडीचा विनयभंग करत असल्याचे एका शेजाऱ्याच्या निदर्शनास आले. शेजाऱ्याने त्याला हटकले असता, अझीझने तिथून पळ काढला, मात्र त्यानंतर सीसीटिव्ही फुटेज व्हायरल झाल्याने संतप्त जमावाने अझीझला गाठून जबर मारहाण करण्यास सुरुवात केली. पोलिसांनी त्याला रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

### नगरसेवक रमेश म्हात्रे अखेर पोलिसांना शरण

कल्याणः डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयातील डॉक्टरांवर झालेल्या हल्ला प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या कठोर भूमिकेनंतर शिंदेसेनेचा नगरसेवक रमेश म्हात्रे अखेर विष्णूनगर पोलीस ठाण्यात हजर झाला आहे. न्यायालयाने संध्याकाळी ५ पर्यंतची मुदत दिली होती. त्याच्या काही तास आधी म्हात्रेने पोलिसांसमोर शरणागती पत्करली. म्हात्रे यांना कल्याण दंडाधिकारी न्यायालयात नेण्यात आले, जिथे त्यांना ३ ऑगस्टपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. कल्याण न्यायालयाने म्हात्रेला दिलेला जामीन मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केला. अनेक गुन्हे नावावर असलेल्या म्हात्रेला जामीन देणाऱ्या कल्याण न्यायालयाबद्दल उच्च न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले होते. १९ जुलैच्या संध्याकाळी ५ पर्यंत पोलिसांसमोर हजर न झाल्यास मालमत्ता जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल, अशी भूमिका न्यायालयाने घेतली होती. न्यायालयाच्या या इशाऱ्यानंतर म्हात्रे पोलीस ठाण्यात हजर झाला.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ४.५० क्विंटल** | | |
| २,३०३ | २,६०० | २,४८३ |
| **ज्वारी/हायब्रिड: २२.०० क्विंटल** | | |
| २,७९२ | ५,१४१ | ३,८४० |
| **मका/लोकल: ४.०० क्विंटल** | | |
| १,७७० | १,७७० | १,७७० |
| **तूर : २.०० क्विंटल** | | |
| ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| **उडीद : २.०० क्विंटल** | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| **बाजरी: ८.०० क्विंटल** | | |
| २,५५० | २,६०१ | २,५७५ |
| **मुग: १.०० क्विंटल** | | |
| ७,०६० | ७,०६० | ७,०६० |
| **सोयाबीन:१.५० क्विंटल** | | |
| ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| **हरभरा: ०.५० क्विंटल** | | |
| ५,३६० | ५,३६० | ५,३६० |

# सिलिंग जमिनींच्या शर्तभंग प्रकरणांत मोठा दिलासा

## आता फक्त शेवटच्या व्यवहाराचा दंड भरून जमीन नियमित करता येणार; राज्य शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

**सिलिंग कायद्यान्वये वाटप झालेल्या शेतजमिनींच्या बेकायदेशीर हस्तांतरणाच्या (खरेदी–विक्री) प्रकरणांमध्ये राज्य शासनाने मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. यापुढे अशा जमिनींचे पूर्वी कितीही वेळा जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय हस्तांतरण झाले असले, तरी सध्याच्या जमीनधारकाकडून**



**प्रत्येक व्यवहारासाठी स्वतंत्र दंड आकारला जाणार नाही. त्याऐवजी केवळ शेवटच्या शर्तभंगासाठी दंड भरून जमीन नियमित करण्याची मुभा देण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो शेतकरी आणि जमीनधारकांना मोठा दिलासा मिळणार असून महसूल विभागावरील प्रशासकीय भारही लक्षणीयरीत्या कमी होणार आहे.**

राज्य शासनाच्या नव्या शासन निर्णयानुसार, सिलिंग कायद्यांतर्गत वाटप झालेल्या किंवा शासनाच्या अटींवर देण्यात आलेल्या जमिनींचे पूर्वी कितीही वेळा बेकायदेशीर हस्तांतरण झाले असले, तरी सध्याच्या धारकाकडून फक्त शेवटच्या शर्तभंगासाठीच दंड आकारण्यात येणार आहे. हा दंड भरल्यानंतर संबंधित जमीन नियमित मानली जाणार असून जुन्या प्रत्येक व्यवहाराची स्वतंत्र चौकशी करून त्यावर वेगळा दंड ▶▶ पान २ वर

## सोनम वांगचुक यांना हायकोर्टाकडून दिलासा नाही

### मेदान्ता रुग्णालयात हलवण्याची परवानगी नाकारली



दिल्ली । वृत्तसंस्था

'प्रत्येक जीव मौल्यवान आहे. सोनम वांगचुक यांच्या पत्नी आणि भावाला त्यांना २४ तास भेटण्याची मुभा देण्यात आली आहे. याबद्दल अतिरिक्त सॉलिसिटर जनरल आणि डॉक्टरांनी केलेल्या निवेदनाचीही आम्ही दखल घेतली आहे. वांगचुक यांच्या कुटुंबीयांना स्वतंत्र खोली देण्यात आली असून, ते त्यांच्यासोबत वेळ घालवू शकत आहेत, त्यामुळे या टप्प्यावर कोणताही अंतरिम आदेश पारित करण्याची आवश्यकता नाही. सोनम वांगचूक यांच्या वैद्यकीय स्थितीबाबतचा अंतिम निर्णय वैद्यकीय पथकाद्वारे घेतला जाईल, असे स्पष्ट करत वांगचुक यांना सरकारी सफदरजंग रुग्णालयातून खासगी मेदांता रुग्णालयात हलवण्याची मागणी करणारी याचिका दिल्ली ▶▶ पान २ वर

## भाजपचा डीएनए ओबीसींचा नाहीतर कारखानदारांचा

### लक्ष्मण हाकेंची टीका, नवीन राजकीय पक्षाची घोषणा



बारामती । प्रतिनिधी

**ओबीसी नेते लक्ष्मण हाके नवीन राजकीय पक्ष काढणार आहेत. ओबीसी जनता पार्टी असे त्यांच्या पक्षाचे नाव असणार आहे, याबाबतची माहिती खुद्द लक्ष्मण हाके यांनी बोलताना दिली आहे. ओबीसींच्या प्रतिनिधित्व करण्यासाठी आगामी काळात लक्ष्मण हाके ओबीसी जनता पार्टीच्या माध्यमातून निवडणूक लढणार असल्याची घोषणा लक्ष्मण हाके यांनी केले आहे. भाजपचा डीएनए हा ओबीसी राहिला नाही, आता कारखानदारांचा झाला आहे अशी टीका देखील हाके यांनी केली. तसेच भाजपने पक्ष फोडाफोडी केली याचा देखील समर्थन केले मात्र आता काही गरज नसताना त्यांनी राष्ट्रवादीला सोबत घ्यायची तसेच शिवसेना फोडण्याची काय गरज होती.? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला.**

देशामध्ये वेगळ्या राजकीय घटना घडत आहेत. दुसऱ्या बाजूला वारी सुरु आहे. पांडुरंगाकडे एकच मागणे आहे महापुजेला येणाऱ्या मुख्यमंत्र्यांना एकच सद्बुद्धी मिळावी की फोडोफोडी बंद करावी. आता सर्वसामान्य माणसांच्या प्रश्नावर काम करायला सुरुवात करा, सत्ता येऊन बरेच दिवस झाले आहेत असे हाके म्हणाले. सत्तेत बसल्यानंतर माणसे फोडण्याचे काय कारण आहे असे हाके म्हणाले. भाजपला सत्तेत जाण्यासाठी एकनाथ शिंदेंची ▶▶ पान २ वर

## तृणमूलच्या बंडखोर खासदारांची स्वतंत्र आसन व्यवस्था

### इंडिया आघाडी सदस्य बैठकीतून बाहेर

दिल्ली । प्रतिनिधी

**बंडखोर तृणमूल काँग्रेसच्या (टीएमसी) खासदारांसाठी स्वतंत्र आसनव्यवस्थेवरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, इंडिया आघाडीच्या खासदारांनी बैठकीतून सभात्याग केल्याने रविवारी संसदेच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी केंद्राच्या सर्वपक्षीय बैठकीत मोठा नाट्यमय प्रसंग घडला. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी संसद परिशिष्टात बोलावलेल्या या बैठकीत, सरकारच्या कायदेविषयक अजेंड्यावर आणि आगामी अधिवेशनात चर्चेत राहण्याची शक्यता असलेल्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी प्रमुख राजकीय पक्षांचे सभागृह नेते उपस्थित होते.**



केंद्र सरकारने सुमारे २० बंडखोर टीएमसी खासदारांचा समावेश असलेल्या नॅशनलिस्ट काँग्रेस ऑफ प्रोग्रेसिव्ह इंडियाच्या (एनसीपीआय) प्रतिनिधींना बैठकीत आमंत्रित करून त्यांच्यासाठी स्वतंत्र टेबल दिल्यानंतर विरोधी पक्षांनी बैठकीतून सभात्याग केला. या घडामोडीला ▶▶ पान २ वर

## जामखेड जवळ भीषण अपघात दोन शासकीय कर्मचाऱ्यांचा मृत्यू

जामखेड । प्रतिनिधी

जामखेड–माहीजळगाव राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८–डीवरील पाटोदा (गरडाचे) परिसरात रविवारी (दि. १९) पहाटे आयशर व कार यांच्यात समोरासमोर झालेल्या भीषण धडकेत दोन शासकीय कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेत श्रीगोंदा तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यक विकील बहुरे आणि कुकडी पाटबंधारे उपविभाग, करमाळा येथील मोजणीदार रामचंद्र बहुरे यांचा मृत्यू झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आयसर (एमएच–१४ बीजे–२२८३) आणि हुंडाई वेन्यू (एमएच–२० जीई–३५६२) यांच्यात पाटोदा (गरडाचे) येथे जोरदार धडक झाली. अपघातानंतर १०८ रुग्णवाहिकेद्वारे दोघांना ग्रामीण रुग्णालयात





दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. दरम्यान, पाटोदा–रत्नापूर दरम्यान महामार्गावर पडलेल्या भेगांमुळे दुरुस्तीचे काम सुरू असून, एका बाजूची वाहतूक बंद करून एकेरी वाहतूक सुरू होती. याच ठिकाणी हा अपघात घडल्याने दुरुस्तीच्या कामाच्या सुरक्षिततेवर ▶▶ पान २ वर

## बेजबाबदार सरकार बदलण्यासाठी लढा उभारा

### ● उद्धव ठाकरे यांची केंद्र सरकार टीका

मुंबई । प्रतिनिधी



जबाबदारी न स्वीकारणाऱ्या सरकारला बदलण्यासाठी आता लढा उभारला पाहिजे, असे म्हणत ठाकरेसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी रविवारी भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर टीका केली. मुंबईतील एका सभेत बोलताना त्यांनी सरकारवर तरुणांचे भविष्य हिरावून घेतल्याचा आरोप केला. त्यांनी नीट परीक्षेतील कथित अनियमितता आणि संबंधित विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचा संदर्भ दिला.

या मुद्द्यांमुळेच पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी उपोषण सुरू केले आहे. संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी ठाकरे यांनी सरकारवर ही टीका केली. जबाबदारी न स्वीकारणाऱ्या ▶▶ पान २ वर

## पुढील चार दिवस राज्यात जोरदार पाऊस

मुंबई । प्रतिनिधी

**जून महिन्याच्या सुरुवातीला जोर धरलेल्या पावसाने गेल्या काही दिवसांपासून दांडी मारल्याने चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना या पावसामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. अशातच पुढील चार दिवसांसाठी हवामान विभागाने जोरदार पावसाचा नवा अंदाज वर्तवला आहे. २३ जुलै पर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. मुंबईसह कोकणात रायगड, रत्नागिरी आणि**



**सिंधुदुर्ग जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. तसेच पालघर, ठाणे आणि नवी मुंबई या भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे.**

उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक येथे जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. तर हवामान विभागाने या जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट जारी केला. तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांत जोरदार पावसाची शक्यता नसून ढगाळ आणि दमट वातावरण कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. ▶▶ पान २ वर

# राम मंदिरातील देणगीची 'स्वतंत्र आणि सर्वसमावेशक' चौकशी करा

### राहुल गांधी आणि खर्गेंचे पंतप्रधान मोदींना पत्र, मोदीच्या मौनावर आक्षेप

दिल्ली । वृत्तसंस्था

**अयोध्येतील श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टमधील देणगी चोरीच्या कथित प्रकरणाची ''स्वतंत्र आणि सर्वसमावेशक'' चौकशी करावी, अशी मागणी करणारे पत्र राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले आहे. या मुद्द्यावर पंतप्रधानांच्या सततच्या मौनाला ''अस्वीकारार्ह'' असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.**

''अशा गुन्ह्यासमोर तुमचे आताचे मौन हे अस्वीकारार्ह आहे. जबाबदारी



निश्चित करणे आणि नुकसान भरपाई करणे हे तुमचे कर्तव्य आहे. सरकार आणि ट्रस्टची विश्वसार्हता तुम्ही किती पारदर्शक आणि वेगाने काम करता यावर अवलंबून आहे आणि भारताची जनता याकडे लक्ष ठेवून आहे,'' असे या दोन्ही नेत्यांनी पत्रात म्हटले आहे. मंदिराच्या देणग्यांमध्ये झालेल्या कथित अफरातफरीप्रकरणी २५ जून रोजी एफआयआर नोंदवण्यात आल्यानंतर जवळपास एका महिन्याने हे पत्र समोर आले आहे. खर्गे आणि राहुल गांधी यांनी पत्रात नमूद केले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पंतप्रधान मोदी यांनी संसदेत या ट्रस्टच्या स्थापनेची घोषणा केली होती, परंतु याच्या सदस्यांची नियुक्ती ''केवळ आणि केवळ'' तुमच्या सरकारद्वारे केली गेली आहे. ट्रस्टचे सदस्य आरएसएस, व्हीएचपी आणि त्यांच्या संलग्न संघटनांशी जोडलेले आहेत आणि त्याचे ''बदनामी झालेले'' माजी सरचिटणीस मोदींचे ''निकटवर्तीय'' होते, हे जगजाहीर आहे, असे त्यांनी म्हटले आहे. काँग्रेस नेत्यांनी मागणी केली आहे की, रोख रक्कम, सोने आणि चांदीच्या दानासह ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी केली जावी आणि त्याचे निष्कर्ष ट्रस्टच्या खात्यांसह सार्वजनिक केले जावेत. ''पद किंवा ▶▶ पान २ वर

## ज्येष्ठ समाजवादी विचारवंत डॉ.कुमार सप्तर्षी यांचे निधन

पुणे । प्रतिनिधी



**ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्ये, समाजवादी विचारवंत, महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष, माजी आमदार, लेखक आणि युवक क्रांती दलाचे संस्थापक डॉ.कुमार सप्तर्षी यांचे वयाच्या ८५ वर्षी पुण्याच्या खासगी रूग्णालयात निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी डॉ उर्मिला, मुलगा आणि सून असा परिवार आहे.**

डॉ.कुमार सप्तर्षी यांना मधूमेहाचा त्रास होता. ते मागील काही वर्षापासून सामाजिक चळवळीपासून काहीसे दूर राहिले होते. तसेच त्यांची सार्वजनिक कार्यक्रमातील उपस्थितीही कमी झाली होती. मात्र शनिवारी डॉ कुमार सप्तर्षी यांना अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना तातडीने खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# सेमिकंडक्टर मिशन २.० : घोषणांपेक्षा उत्तरदायित्वाची गरज

भारताने सेमिकंडक्टर उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकत २.० साठी सुमारे ₹१.२७ लाख कोटींच्या तरतुदीची घोषणा केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ५, संरक्षण, इलेक्ट्रिक वाहने, डेटा सेंटर्स आणि डिजिटल अर्थव्यवस्थेच्या वेगवान विस्ताराच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय दूरदृष्टीचा मानावा लागेल. कारण भविष्यातील आर्थिक आणि सामरिक महासत्ता होण्याचा मार्ग सेमिकंडक्टर तंत्रज्ञानातूनच जातो. मात्र, या महत्त्वाकांक्षी घोषणेइतकाच महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पहिल्या टप्प्याचा नेमका लेखाजोखा काय?

डिसेंबर २०२१ मध्ये जाहीर झालेल्या ₹७६ हजार कोटींच्या पहिल्या सेमिकंडक्टर मिशनचा उद्देश भारतात चिप उत्पादन, - सुविधा, डिस्प्ले फॅब आणि चिप डिझाइन परिसंस्था उभारणे हा होता. टाटा समूहासह काही मोठ्या कंपन्यांचे प्रकल्प मंजूर झाले, काही बांधकामाच्या टप्प्यावर पोहोचले, तर चिप डिझाइन स्टार्टअप्सनाही प्रोत्साहन मिळाले. या घडामोडी निश्चितच सकारात्मक आहेत. परंतु केवळ मंजुरी म्हणजे यश नव्हे. प्रत्यक्ष उत्पादन, रोजगारनिर्मिती, आयात कमी होणे, निर्यात वाढणे आणि तंत्रज्ञानातील स्वावलंबन या निकषांवर आजपर्यंतचा परिणाम काय, याचे अधिकृत आणि सर्वसमावेशक चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. सेमिकंडक्टर उद्योग हा झटपट यश देणारा उद्योग नाही. अत्याधुनिक फॅब उभारण्यासाठी प्रचंड भांडवली गुंतवणूक, अत्यंत उच्च दर्जाचे तंत्रज्ञान, प्रशिक्षित मनुष्यबळ, संशोधन आणि जागतिक भागीदारी आवश्यक असते. त्यामुळे पाच वर्षांत भारत जगातील आघाडीचे चिप उत्पादक बनेल, अशी अपेक्षा वास्तववादी ठरणार नाही. पण म्हणूनच सरकारने जनतेसमोर वस्तुनिष्ठ प्रगती अहवाल ठेवणे अधिक आवश्यक ठरते. कारण सार्वजनिक निधीचा वापर किती परिणामकारक झाला, हे जाणून घेण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. फेज-२ची घोषणा करताना केवळ निधी वाढवणे पुरेसे ठरणार नाही. फेज-१मधील यश-अपयश, आलेल्या अडचणी आणि शिकवण यांचे पारदर्शक मूल्यमापन आवश्यक आहे. प्रत्येक मंजूर प्रकल्पाची सद्यस्थिती, वितरित अनुदान, उत्पादन क्षमता, रोजगारनिर्मिती आणि देशांतर्गत मूल्यवर्धन यांचा सविस्तर अहवाल सरकारने सार्वजनिक करणे गरजेचे आहे. नियंत्रक आणि महालेखापरीक्षक किंवा स्वतंत्र तज्ज्ञ समितीकडून कार्यप्रदर्शनाचे मूल्यमापन झाले, तर या योजनेची विश्वासार्हता अधिक वाढेल. भारतासमोरील खरी लढाई केवळ फॅब उभारण्याची नाही, तर संपूर्ण सेमिकंडक्टर परिसंस्था विकसित करण्याची आहे. रसायने, उपकरणे, पॅकेजिंग, डिझाइन, संशोधन, पेटंट्स, कौशल्य विकास आणि उद्योग-विद्यापीठ सहकार्य याशिवाय जागतिक स्पर्धेत टिकणे अशक्य आहे. भारताकडे सक्षम अभियंते आहेत; परंतु संशोधनासाठी आवश्यक सुविधा आणि संधी देशात निर्माण झाल्या, तरच 'ब्रेन ड्रेन'चे 'ब्रेन गेन'मध्ये रूपांतर होईल. आज अमेरिका, युरोप आणि चीन यांनी सेमिकंडक्टरला राष्ट्रीय सुरक्षेचा विषय मानून दीर्घकालीन धोरणे स्वीकारली आहेत. भारतानेही त्याच दिशेने वाटचाल सुरू केली आहे. मात्र, या प्रवासात केवळ मोठ्या आर्थिक घोषणा पुरेशा नाहीत. पारदर्शक अंमलबजावणी, नियमित मूल्यमापन आणि उत्तरदायित्व यांनाच तितकेच महत्त्व द्यावे लागेल. भारताला सेमिकंडक्टर महासत्ता बनविण्याचे स्वप्न नक्कीच साध्य होऊ शकते. परंतु त्या स्वप्नाची पायाभरणी केवळ कोट्यवधींच्या घोषणांनी होणार नाही; ती संशोधन, तंत्रज्ञान, सक्षम धोरण, सार्वजनिक विश्वास आणि परिणामकारक अंमलबजावणी यांवरच उभी राहील. त्यामुळे २.० सुरू करताना सरकारने सर्वप्रथम १.० चा सविस्तर लेखाजोखा देशासमोर मांडणे ही केवळ औपचारिकता नसून लोकशाहीतील उत्तरदायित्वाची कसोटी आहे. सेमिकंडक्टर क्षेत्रातील भारताची पुढील झेप ही निधीच्या आकारावर नव्हे, तर शासनाच्या पारदर्शकतेवर आणि धोरणाच्या गुणवत्तेवर ठरणार आहे.

# जिल्हा रुग्णालय येथे अधिकृत बस थांबा सुरू



**बीड । प्रतिनिधी**

प्रवाशांना अधिक चांगली सेवा मिळावी म्हणून बीडच्या एसटी विभागाने एक पाऊल पुढे टाकत बार्शी रोडवर जिल्हा रुग्णालय आणि शिवाजीनगर पोलीस ठाणे लगत अधिकृत बस थांबा सुरू केला आहे. येथे बार्शी रोड आणि तेलगाव रोड कडे जाणाऱ्या सर्व गाड्या थांबणार असल्याने उस्मानाबाद, सोलापूर, गुलबर्गा, परभणी यासारख्या मोठ्या शहरांसह अनेक तालुक्यात जाणाऱ्या प्रवाशांची सोय झाली आहे. यासाठी इथे एक वाहतूक नियंत्रकाची नेमणूक ही करण्यात आली आहे. एसटी महामंडळाच्या विभाग नियंत्रक सौ. अनुजा दुसाने यांनी हा थांबा कार्यान्वित करण्यासाठी विशेष कार्य केले आहे. आता ऊन, वारा, पाऊस यापासून प्रवाशांना त्रास होऊ नये याकरिता बीड नगरपरिषद ने येथे पत्र्याचे शेड उभारणे गरजेचे आहे.

बीड शहरात आता दूरदूर पर्यंत नागरी वसाहती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. वाढलेल्या अंतरामुळे प्रवाशांना गावी जाताना एसटी बस स्थानकात जाऊन बस पकडण्यासाठी जास्तीचा वेळ आणि खर्च होत होता. ही बाब लक्षात घेऊन एसटी महामंडळाच्या विभाग नियंत्रक सौ. अनुजा दुसाने यांनी प्रवाशांची सोय व्हावी याकरिता जिल्हा रुग्णालय आणि शिवाजीनगर पोलीस ठाणे लगत बार्शी रोडवर अधिकृत बस थांबा सुरू केला आहे. येथे बार्शी रोड आणि तेलगाव रोड कडे जाणारी प्रत्येक एसटी बस थांबणार आहे. यासाठी इथे एक वाहतूक नियंत्रकाची नियुक्ती ही करण्यात आली असून त्यांच्यासाठी एक पत्र्याचे कॅबिन सुद्धा ठेवण्यात आले आहे. येथून जाताना आता एकही बस इथे थांबा घेतल्याशिवाय पुढे जाणार नाही असे नियोजन करण्यात आले आहे. एसटी महामंडळाने प्रवाशांच्या सेवेसाठी एक पाऊल पुढे टाकले असून बसची वाट पाहत उभे राहिलेल्या प्रवाशांसाठी आता बीड नगर परिषदेने ने येथे एक पत्र्याचे शेड उभारणे गरजेचे आहे. असे या थांब्याची पाहणी करताना एसटीचे सुरक्षा व दक्षता अधिकारी रणजीत यादव, वाहतूक नियंत्रक महेश भावसार आणि अनेक प्रवाशांची उपस्थिती होती. बीड शहराची वाढलेली व्याप्ती लक्षात घेऊन एसटी महामंडळाने वेगवेगळ्या रस्त्यांवर विशेष थांब्यांचा संकल्प केला आहे. या अनुषंगाने प्रथम बार्शी रोडवर थांबा केला असून लवकरच अहिल्यानगर रोडवर सार्वजनिक बांधकाम कार्यालयालगत थांबा बनवण्यात येणार आहे. यामुळे अहिल्यानगर, पुणे, मुंबई सारख्या महानगरात जाणाऱ्या प्रवाशांची सोय होणार आहे. अशी माहिती एसटीचे सुरक्षा व दक्षता अधिकारी रणजीत यादव यांनी दिली आहे. बीड शहरातून जाणाऱ्या प्रमुख मार्गापैकी एक असलेल्या जालना रोडवर सुद्धा अशाच प्रकारे मोंढा रोड टी पॉईंट वर अधिकृत एसटी बस थांबा करणे आवश्यक आहे. जालना, औरंगाबादहून बीड कडे येताना एसटी बस येथे प्रवासी सोडते परंतु बीडहून जालना-औरंगाबाद कडे जाणाऱ्या बसेस मात्र एकदा बस स्थानक सोडले की मध्ये कुठेही थांबून प्रवासी घेत नाहीत. यामुळे या परिसरातून गावी जाणाऱ्या प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होते आहे. ही बाब लक्षात घेता जालना रोडवर मोंढा टी पॉईंट येथे सुद्धा एसटी बस थांबा निर्माण करणे आवश्यक आहे.

# अशोक मा.व.उ.मा.विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.आर.सावंत यांचा सेवापूर्ती सोहळा



**वडवणी । प्रतिनिधी**

**तालुक्यातील चिंचाळा.. येथील अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य बी.आर.सावंत यांची दिनांक ३० जून २०२६ रोजी दीर्घ सेवा पूर्ण झाली. त्यानिमित्त वडवणी येथील मंगल कार्यालयात सेवापूर्ती सोहळा उत्साहात पार पडला.**

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सर्जेराव काळे सर होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वडवणीचे गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी, रोटरी क्लबचे अध्यक्ष सुनील कुलकर्णी, वडवणी पं.सं.चे माजी सभापती प्रशांत सावंत,बाबुराव शेंडगे महाराज(अध्यक्ष संतश्रेष्ठ तुकाराम महाराज सामाजिक प्रतिष्ठान मोरवड), प्राचार्य सोमनाथ बडे (माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ढेकणमोहा), मोरवडचे माजी सरपंच नंदकुमार मस्के हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री पटाईत यांनी केले. या सेवापुर्ती कार्यक्रमानिमित्त श्री.खळगे, श्री.आवारे,श्री.पटाईत, श्री.गडदे, श्री.राठोड, श्री.राऊत, श्री.मस्के यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर सत्कारमूर्ती श्री सावंत यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अध्यक्षीय समारोप संस्था अध्यक्ष श्री.सर्जेराव काळे सर व सौ. शोभाताई संस्थापक अध्यक्ष यांनी आपले मनोगत व्यक्त केले व श्री.सावंत यांच्या कार्याविषयी सर्वांना सखोल मार्गदर्शन केले व त्यांचा सपत्नीक गुणगौरव केला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार श्री. घोडके मानले.

# माजलगाव नगर परिषदेत कथित गैरव्यवहार उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे चौकशीची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

**माजलगाव नगर परिषदेतील कथित गैरव्यवहार, बनावट कागदपत्रे, खोट्या स्वाक्षऱ्या आणि अभिलेखांमध्ये फेरफार केल्याच्या आरोपांबाबत रिपब्लिकन पक्षाच्या वतीने उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनात संबंधित प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.**

निवेदनात नगर परिषदेतील लिपिक शिवहर शेटे, विघ्नेश मुंडे आणि अक्षय धारक यांच्यावर गुंठेवारी व मालमत्ता प्रकरणांमध्ये बनावट आदेश तयार करणे, खोट्या स्वाक्षऱ्या करून प्रमाणपत्रे देणे, अभिलेखांमध्ये फेरफार करणे तसेच विविध नोंदींमध्ये खाडाखोड केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या प्रकारामुळे शासनाची दिशाभूल झाली असून नागरिकांचीही फसवणूक झाल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच पी.टी.आर., गुंठेवारी, मालमत्ता नोंदी आणि इतर शासकीय अभिलेखांमध्येही नियमबाह्य बदल केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.



या सर्व प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमान्वये गुन्हे दाखल करावेत, शासनाचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूल करावे तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधितांना निलंबित करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, निवेदनातील . या प्रकरणातील आरोपांची सत्यता सक्षम यंत्रणेकडून होणाऱ्या चौकशीनंतरच स्पष्ट होईल मात्र या निवेदनामुळे माजलगाव नगर परिषदेतील गैरव्यवहाराचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून शासन या प्रकरणात कोणती भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. लवकरच या दोषीवर कारवाई नाही झाल्यास पीपल्स पार्टीचे तालुकाध्यक्ष राकेश साळवे, विधानसभा अध्यक्ष सिद्धार्थ ससाणे,सह कार्यकर्ते लोकशाही मार्गाने उपोषण करण्यात येईल असा इशारा दिला आहे.

# आरणगाव ते श्रीक्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळा उत्साहात

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील आरणगाव येथून ह.भ.प. नारायण महाराज शिरसाठ यांच्या कुशल नेतृत्वाखाली तसेच परमपूज्य राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या कृपाशीर्वादाने आणि व्याकरणाचार्य ह.भ.प. लाड गुरुजी यांच्या आशीर्वादाने श्रीक्षेत्र पंढरपूरकडे निघालेला पायी दिंडी सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात सुरू आहे.

दिनांक १५ जुलै २०२६ रोजी आरणगाव येथून प्रस्थान केलेली ही दिंडी मजल-दरमजल करीत काल भूम येथे मुक्कामी होती. यावेळी रात्री ह.भ.प. नारायण महाराज शिरसाठ यांचे ''पायी वारी'' या विषयावर सविस्तर हरिकीर्तन झाले. कीर्तनामध्ये महाराजांनी संतसंगतीचे महत्त्व विशद करत, प्रत्येकाने भगवंताची



मनोभावे सेवा करावी, जीवनात अहंकाराचा त्याग करून परस्परांमध्ये प्रेम, आपुलकी आणि सहकार्याची भावना जोपासावी, तसेच शक्य असेल तेव्हा पायी वारी करून विठ्ठलभक्तीचा अनुभव घ्यावा, असा मोलाचा संदेश दिला. या पायी दिंडी सोहळ्यात आरणगावसह परिसरातील मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले असून संपूर्ण मार्गावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. दिंडीच्या प्रत्येक मुक्कामी भाविकांसाठी भोजन, निवास व इतर आवश्यक सुविधांची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. आरणगावचे ग्रामदैवत गिरीजाशंकर यांच्या कृपेने तसेच समस्त ग्रामस्थांच्या सहकार्याने हा दिंडी सोहळा यशस्वीपणे सुरू आहे. या पायी दिंडीचे हे दुसरे वर्ष असून दिंडीचे प्रमुख राम सोनवणे, प्रमुख सहकारी बबन इथापे व वसंत शिरसाठ तर, दिंडीचे नेतृत्व ह.भ.प. नारायण महाराज शिरसाठ करत आहेत. अधिक माहितीसाठी ९११२८८१२५२ किंवा ९५४५८२८५९१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन ह.भ.प. नारायण महाराज शिरसाठ यांनी केले आहे.

## पान १ वरून...

### सिलिंग जमिनींच्या शर्तभंग

आकारण्याची गरज राहणार नाही. शेवटचा शर्तभंग नियमित करण्यासाठी संबंधित जमिनीच्या सध्याच्या बाजारमूल्याच्या ७५ टक्के रक्कम शासनाकडे जमा करावी लागणार आहे. ही रक्कम भरल्यानंतर जमीन नियमित होईल. त्यानंतर संबंधित जमीन भोगवटादार वर्ग-२ मधून भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्याची प्रक्रिया पूर्ण करता येईल. वर्ग-१ मध्ये रूपांतर झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीने संबंधित जमीन कायदेशीररित्या विक्री, हस्तांतरण किंवा इतर व्यवहारासाठी वापरता येणार आहे. शासनाने जुन्या प्रकरणांमध्ये सवलत दिली असली, तरी भविष्यात नियमभंग करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचा इशाराही दिला आहे. जमीनधारकाने पुढे जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय जमीन विक्री, हस्तांतरण किंवा भाडेतत्त्वावर दिल्यास तो नवीन शर्तभंग मानला जाईल. अशा प्रकरणांमध्ये या सवलतीचा लाभ मिळणार नाही आणि २४ जानेवारी २०२४ रोजी लागू करण्यात आलेल्या सुधारित तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई केली जाईल. नव्या शासन निर्णयाचा लाभ महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ अंतर्गत भूमिहीन शेतमजूर व इतर पात्र लाभार्थ्यांना वाटप झालेल्या सिलिंग जमिनी. शासनाच्या अटींवर वाटप करण्यात आलेल्या भोगवटादार वर्ग-२ मधील शेतजमिनी. मुख्य अधिनियमाच्या कलम २८-१ (अ) अंतर्गत औद्योगिक वापरासाठी भाडेतत्त्वावर (लीज) देण्यात आलेल्या भोगवटादार वर्ग-१ व वर्ग-२ मधील जमिनी. यांना होणार आहे. या निर्णयामुळे अनेक दशकांपासून विविध महसूल कार्यालयांमध्ये प्रलंबित असलेल्या सिलिंग जमिनींच्या शर्तभंगाच्या प्रकरणांचा मार्ग मोकळा होणार आहे. जुने व्यवहार तपासण्याची प्रक्रिया टळल्याने प्रकरणांचा निपटारा जलद होण्यास मदत होईल. तसेच महसूल विभागावरील प्रशासकीय ताणही कमी होणार आहे. तथापि, भविष्यातील कोणताही व्यवहार जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नसल्याने जमीनधारकांनी शासनाच्या अटींचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहणार आहे. अन्यथा नवीन शर्तभंग म्हणून कठोर कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

------------

### भाजपचा डीएनए ओबीसींचा नाहीतर

गरज होती. मात्र अजितदादांच्या गटाची काय गरज होती असे हाके म्हणाले. एकदा तुम्ही ममता बॅनर्जीचा पक्ष फोडता, उरलासुरला उद्धव ठाकरेंचा पक्ष फोडता असे हाके म्हणाले. उद्धव ठाकरेंचे खासदार तर जी लोकं फुटली त्यांचे विरोधात निवडून आले आणि तेच परत शिंदेकडे गेल्याचे हाके म्हणाले. भाजपचा डीएनए आता कारखानदारांचा झाला असून, त्यांचा डीएनए आता प्रसाद लाड आहे, प्रविण दरेकर आहे असी टीका हाकेंनी केली. सत्ता येत असते जात असते, मुख्यमंत्री येत असतात जात असतात. पण मी ज्या प्रवर्गाची भाषा बोलतोय त्याच्या शोषणावर राष्ट्रवादीने काय केले ते मला सांगा, असा सवाल हाकेंनी केला. राष्ट्रवादीने कोणता लढा उभारलाय ते मला सांगा असे हाके म्हणाले. राष्ट्रवादी नेमही सत्तेच्या वळचणीला गेली. कारखाने काढले, उद्योगपतींशी साटेलोटे केले. दोन्ही राष्ट्रवादी एक आहेत. निवडणुका लढल्या तरी हे तुम्हाला दाखावण्यासाठी आहे. हे लोक सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आहे कुणी सांगितले असे हाके म्हणाले.

---------------

### सोनम वांगचुक यांना हायकोर्टाकडून

उच्च न्यायालयाने रविवारी (दि.१९) फेटाळून लावली. त्यांना हलवताना कोणताही बळाचा वापर करण्यात आला नव्हता, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. दरम्यान, कारवाईविरोधात त्यांच्या पत्नी गीतांजली जे. आंग्मो यांनी दाखल केलेल्या याचिकेवर उच्च न्यायालयात सुनावणी झाली. वांगचुक यांच्या पत्नीच्या वतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी न्यायालयात बाजू मांडली, तर सरकारने त्यांच्या रुग्णालयातील दाखल करण्याचे समर्थन केले. यावेळी उच्च न्यायालयाने सरकारी पक्षाला धारेवर धरत विचारले की, ''सोनम वांगचुक यांना रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी कोणती अपरिहार्य किंवा आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली होती का, हे सांगण्याची गरज तुम्हाला वाटते का?'' न्यायालयाच्या या प्रश्नावर सरकारची बाजू मांडणारे सहाय्यक सॉलिसिटर जनरल यांनी सांगितले की, रुग्णालयाकडून नियमित मेडिकल बुलेटिन जारी केले जात असून सफदरजंग रुग्णालयाचे डॉक्टर स्वतः कोर्टात हजर आहेत. ''वांगचुक यांची प्रकृती झपाट्याने खालावत होती. अशा दमट हवामानात सलग १८ दिवस उपवास केल्यामुळे शरीरात केटोसिस नावाची गंभीर स्थिती निर्माण होऊ शकते. ही परिस्थिती सुरुवातीला सामान्य वैद्यकीय तपासणी किंवा मापदंडांमध्ये दिसून येत नाही, परंतु यामुळे अचानक शरीराला मोठा शॉक बसू शकतो. सरकारी वकिलांनी पुढे वैद्यकीय कारणांचा हवाला देत सांगितले की, ''दीर्घकाळ उपोषण केल्यामुळे शरीरातील पोटॅशियमची पातळी कमी होते, ज्यामुळे हायपोग्लायसेमिया (रक्तातील साखर अत्यंत कमी होणे) सारखी धोकादायक स्थिती निर्माण होऊ शकते आणि किडनीवर परिणाम होऊ शकतो. म्हणूनच त्यांच्या आरोग्याचा विचार करूनच त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

------------

### जामखेड जवळ भीषण अपघात

प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महामार्गावरील निकृष्ट दर्जाचे काम आणि अपुऱ्या वाहतूक व्यवस्थेमुळे यापूर्वीही या मार्गावर अनेक अपघात झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस नाईक प्रवीण इंगळे करीत आहेत. या भीषण अपघातानंतर संबंधित कंत्राटदाराच्या कामाच्या गुणवत्तेची चौकशी करून निष्काळजीपणा आढळल्यास कठोर कारवाई करावी, तसेच महामार्गावरील दुरुस्तीची कामे सुरक्षित पद्धतीने पूर्ण करून वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

--------------

### तृणमूलच्या बंडखोर खासदारांची स्वतंत्र

विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे, कारण लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी बंडखोर खासदारांना अद्याप एक स्वतंत्र संसदीय पक्ष म्हणून मान्यता दिलेली नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, टीएमसीच्या खासदारांसोबत बसण्यास नकार दिल्यानंतर बंडखोरांना स्वतंत्र जागा देण्यात आली. सभात्यागामागील नेमके कारण अधिकृतपणे सांगण्यात आले नसले तरी, अध्यक्षांकडून औपचारिक मान्यता नसतानाही बंडखोर गटाला स्वतंत्र जागा देण्याच्या सरकारच्या निर्णयावर विरोधी पक्ष नेत्यांनी आक्षेप घेतल्याचे समजते. विरोधी पक्षांच्या विरोधाचे स्पष्टीकरण देताना, टीएमसीच्या खासदार महुआ मोइत्रा म्हणाल्या की, काँग्रेस, समाजवादी पक्ष, डीएमके, झारखंड मुक्ती मोर्चा, आम आदमी पार्टी, नॅशनल कॉन्फरन्स, डावे पक्ष आणि शिवसेना (यूबीटी) यांसह ऑल इंडिया ब्लॉक पक्षांनी, 'तथाकथित एनसीपीआय'च्या उपस्थितीच्या निषेधार्थ सभात्याग केला, ज्याला त्यांनी एक अमान्यताप्राप्त पक्ष म्हटले. खासदार महुआ मोइत्रा पुढे बोलताना म्हणाल्या की, ''या तथाकथित २० बंडखोर खासदारांच्या विलीनीकरणाला अध्यक्षांनी मंजुरी दिलेली नाही. २० अपात्रता याचिका अजूनही प्रलंबित आहेत. ९१ व्या घटनादुरुस्तीनंतर स्वतंत्र गटाला जागा नाही. मग संसदीय कामकाज मंत्र्यांनी या २० बंडखोर खासदारांना कोणत्या आधारावर निमंत्रण दिले आणि ते या बैठकीला कसे उपस्थित राहत आहेत? आम्ही आमचा तीव्र निषेध नोंदवला आहे आणि निषेधाचे प्रतीक म्हणून सभात्याग केला आहे. आणि आम्ही आमच्या सर्व विरोधी पक्षांचे आभार मानतो,'' असेही सांगितले. काँग्रेसचे खासदार प्रमोद तिवारी म्हणाले की, त्यांचा पक्ष ''संविधानाचे रक्षण करण्यासाठी'' सभात्याग करून बाहेर पडला. अध्यक्षांच्या अंतिम निर्णयापूर्वी मान्यता देणे हे ''पूर्णपणे घटनाबाह्य'' असल्याचा आरोप केला. शिवसेना उबाठाचे खासदार अरविंद सावंत यांनीही सरकारच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि विचारले की कोणत्या कायदेशीर तरतुदीनुसार बंडखोर खासदारांना स्वतंत्र ओळख देण्यात आली आहे. ''आम्हीही याचा निषेध केला आहे आणि सभात्याग केला,'' असे सांगितले. 'आप'चे राज्यसभा खासदार एन. डी. गुप्ता यांनी आपल्याच पक्षाच्या वादाशी याची तुलना करत दावा केला की, हे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना 'आप'च्या १० पैकी सात राज्यसभा खासदारांचे 'अपहरण' करण्यात आले आहे. असे असूनही, त्यांना राज्यसभेत स्वतंत्र जागा देण्यात आल्याचा आरोप केला. ''हे लोकशाहीचे निव्वळ अपहरण आणि हत्या आहे,'' असा आरोपही यावेळी केला. या बैठकीला उपस्थित असलेल्या विरोधी पक्षांच्या नेत्यांमध्ये काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश, सीपीआय(एम)चे जॉन ब्रिटास, समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव, टीएमसीचे सौगत रॉय, महुआ मोईत्रा, महुआ माजी, काँग्रेसचे प्रमोद तिवारी, आरएसपीचे एन के प्रेमचंद्रन, राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी) नेत्या सुप्रिया सुळे, काँग्रेसचे खासदार के सुरेश, जेडी(यू)चे संजय झा, डीएमकेचे तिरुची शिवा, काँग्रेसचे गौरव गोगोई, शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे आणि अरविंद सावंत यांचा समावेश होता. सरकारच्या वतीने संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, आरोग्य मंत्री जे पी नड्डा, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू आणि संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल उपस्थित होते. पावसाळी अधिवेशनापूर्वी विरोधकांशी चर्चा करण्यासाठी ही सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली होती. एका दिवसानंतर सुरु होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात अनेक वादग्रस्त मुद्द्यांवर जसे राम मंदिरातील देणग्यांची चोरी, डिलीमिटेशन विधेयक आणि नीट पेपर फुटी प्रकरणी आंदोलन करत असलेल्या सोनम वांगचुक यांना पोलिसांनी जबरदस्तीने उचलणे, आणि इतर संबधिच मुद्यावर जोरदार चर्चा होण्याची शक्यता आहे.

-------------

### पुढील चार दिवस राज्यात

मराठवाडा आणि विदर्भात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यातील बीड, परभणी, हिंगोली, जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. विदर्भातील अकोला, अमरावती, बुलडाणा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांसाठीही यलो अलर्ट देण्यात आला आहे. सलग तीन दिवसांपासून नागपुरात पावसाची हजेरी लागणार आहे. नियमित सरींमुळे उकाडा आणि दमट वातावरणापासून नागपूरकरांना दिलासा मिळणार आहे.

-------------

### बेजबाबदार सरकार बदलण्यासाठी

सरकारला बदलण्यासाठी आता लढा उभारला पाहिजे. आणि हा लढा केवळ सोनम वांगचुक यांच्यासाठी आहे. लडाखमधील पाणीटंचाईवर उपाय म्हणून आइस स्तूप (बर्फाचे स्तूप) उभारणाऱ्या आणि अत्यंत कमी तापमानात काम करणाऱ्या सैनिकांसाठी सौर-ऊर्जेवर चालणारे तंबू तयार करणाऱ्या वांगचुक यांना राष्ट्रविरोधी कसे म्हटले जाऊ शकते, असा सवाल ठाकरे यांनी केला. २०११ मध्ये जेव्हा ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे बेमुदत उपोषणावर होते, तेव्हा तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारने त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी एक शिष्टमंडळ पाठवले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने वांगचुक यांच्या बाबतीत तसे का केले नाही? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

---------------

### ज्येष्ठ समाजवादी विचारवंत

डॉ कुमार सप्तर्षी यांच्यावर सोमवारी २० जुलै रोजी वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यापूर्वी कोथरुड येथील गांधी भवन येथे सकाळी १० ते १२ वेळेत त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. ऐन तारूण्यात असताना समाज परिवर्तनाची चळवळ उभारणारे डॉ.कुमार सप्तर्षी यांनी आयुष्यभर समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार केला. युवकांना संघटीत करून सामाजिक आणि राजकिय परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने त्यांनी युवक क्रांती दल अर्थात युक्रांद संघटनेची स्थापना केली. युक्रांदच्या माध्यमातून त्यांनी हजारो तरूणांना सामाजिक भान, लोकशाही मूल्य आणि परिवर्तनवादी विचारांची प्रेरणा दिली. डॉ.कुमार सप्तर्षी हे फक्त समाजवादी कार्यकर्त्ये नव्हे तर अभ्यासू विचारवंत, वक्ते आणि लेखक म्हणूनही ते ओळखले जात होते. त्यांच्यावर महात्मा गांधी आणि जयप्रकाश नारायण यांच्यासह समाजवादी विचारधारेचा प्रभाव होता. डॉ. कुमार सप्तर्षी यांनी त्याकाळी त्यावेळच्या शंकराचार्यांशी जाहिरपणे हिंदू धर्मातील अंधश्रध्दा आणि धार्मिक मुल्यांवरून वाद घातला होता. त्यावेळी या दोघांमधील वाद चांगलाच गाजला होता. डॉ.कुमार सप्तर्षी यांच्या निधनाचे वृत्त कळताच राजकीय क्षेत्रातील अनेक नेत्यांनी त्यांना आदरांजली वाहिली.

--------------

### राम मंदिरातील देणगीची

प्रभावाचा विचार न करता, जबाबदार आढळणाऱ्या सर्वांना उत्तरदायी धरले पाहिजे,'' असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, एसआयटीच्या प्राथमिक निष्कर्षानुसार, साधारण ४० दिवसांच्या कालावधीत चोरीच्या जवळपास ७० घटना घडल्या. देणग्यांची मोजणी सुरू असताना काही व्यक्ती पैसे काढून घेतानाचे फुटेज समोर आल्याचे सांगितले जात आहे. चंपत राय यांचा माजी ड्रायव्हर राम शंकर यादव याच्यासह आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली आहे. या महिन्यात पंतप्रधान कार्यालयाला पाठवलेले हे दुसरे पत्र आहे. यापूर्वी काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी मोदींना पत्र लिहून प्राथमिक तपासात या अफरातफरीमागे एक ''सुव्यवस्थित नेटवर्क'' असल्याचे दिसून येत असल्याचा आरोप केला होता आणि सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशीची मागणी केली होती.

----------


# विनयभंग प्रकरणी चकलांबा पोलिसात गुन्हा दाखल

**शिरूर । प्रतिनिधी**

सायंकाळच्या वेळी शौचास गेलेल्या ३१ महिलेला ओढत नेऊन तिचा विनयभंग केल्याची घटना शनिवार दि. ४ जुलै रोजी शिरूर कासार तालुक्यातील मातोरी या गावांमध्ये घडली असून पीडित महिलांची महिलेच्या तक्रारीवरून नंदकिशोर उर्फ पप्पू दिनकर जरांगे यांच्या विरोधात चकलांबा पोलिसांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. याप्रकरणी ॲट्रॉसिटी ॲक्ट, विनयभंग केल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास गेवराईचे डी वाय एस पी अनिल काटके हे करीत आहेत.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. २० जुलै २०२६


## थोडक्यात



### नीट परीक्षेतील यशाबद्दल कु.वैष्णवी हंगे मातृभूमीकडून सन्मानित

बीड । प्रतिनिधी

वैद्यकीय राष्ट्रीय पात्रता( नीट ) २०२६ परीक्षेत ७२० पैकी ५७१ गुण घेऊन उल्लेखनीय यश संपादन करत वैद्यकीय शिक्षणाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे. नीट परीक्षेतील उल्लेखनीय यशाबद्दल मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने दिनांक १८ जुलै २०२६ शनिवार रोजी कृष्णानाई नगर येथील मातृभूमी प्रतिष्ठान कार्यालयात तिचा सौ.प्रभा वनवे व सौ. सुलभा तांदळे यांच्या हस्ते शाल,पुष्पगुच्छ, स्टेथोस्कोप व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी वैष्णवीला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत तिच्या मेहनतीचे कौतुक केले. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा शिक्षण व करिअर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे, मुख्याध्यापक राम वनवे, सौ. प्रभा वनवे, सौ. सुलभा तांदळे, सृष्टी तांदळे, कु. वैष्णवी हंगे चे पालक कल्याण हंगे, सौ. आशा वनवे आदींची उपस्थिती होती.

### नागरी ग्रामीण बिगरशेती कर्मचाऱ्यांसाठी दोन दिवशीय प्रशिक्षण

बीड । प्रतिनिधी

दिनांक १५ ७ २०२६ महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणेचे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर व माननीय जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांचे संयुक्त विद्यमाने बीड येथे तालुक्यातील नागरी ग्रामीण बिगरशेती, पगारदार, सेवक, सहकारी पतसंस्थेचे पदाधिकारी, संचालक, कर्मचारी, यांच्या करिता दोन दिवशीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. बीड मुख्य कार्यालय राजूरी वेस, बीड येथे दिनांक २१ ७ २०२६ ते २२ ७ २०२६ या कालावधीत केले आहे या दोन दिवशीय प्रशिक्षण वर्गात मा. सतीश तोटावार साहेब जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड. तसेच बी.जे. ठोंबरे साहेब सेवानिवृत्त प्राचार्य सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर. एस. आर. कोळे साहेब उपप्राचार्य आदेशजी नहार साहेब सनदी लेखापाल दिगंबर कुंडलकर प्रमाणित लेखापरीक्षक हे या कार्यक्रमास मार्गदर्शन करणार आहेत तरी बीड तालुक्यातील नागरी, ग्रामीण, बिगरशेती, पगारदार, सेवक, सहकारी पतसंस्थेचे पदाधिकारी, संचालक, कर्मचारी, यांनी या दोन दिवशीय प्रशिक्षणास उपस्थित राहावे असे आवाहन बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक बबनराव आंधळे सर तसेच लातूर प्रशिक्षण केंद्राचे उपप्राचार्य एस. आर. कोळे साहेब यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.



### माजलगाव धरणात आढळले पुरुषाचे मृतदेह

माजलगाव । प्रतिनिधी

येथील जायकवाडी प्रकल्प टप्पा क्रमांक - २ धरणाच्या केसापुरी वसाहतीच्या बाजूस असलेल्या मच्छी मार्केटसमोरील तलावात एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह दि १९ जुलै रविवार रोजी सकाळी आढळून आला आहे.प्राथमिक माहितीनुसार, पाणी फिल्टर केंद्रासमोरील भागात हा पुरुषाचा मृतदेह असल्याचे निदर्शनास आले. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही

# वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लेखी आदेशानंतरही माहिती अद्याप गुलदस्त्यात?

**२०२२ ते २०२५ मधील वित्त आयोग, मनरेगा व दलित वस्ती विकास कामांची माहिती देण्याचे आदेश धाब्यावर?; ग्रामसेवकांविरोधात कारवाईची मागणी तीव्र**

पाटोदा । प्रतिनिधी

कुसळंब ग्रामपंचायतीतील सन २०२२ ते २०२५ या कालावधीत मनरेगा, पंधरावा वित्त आयोग, अनुसूचित जाती व नवबौद्ध दलित वस्ती विकास योजनांअंतर्गत झालेल्या विकासकामांची संपूर्ण माहिती तात्काळ उपलब्ध करून द्यावी, असे तत्कालीन गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाटोदा यांनी ३० ऑक्टोबर २०२५ रोजी ग्रामसेवक एम. एम. जाधव यांना लेखी आदेशाद्वारे निर्देश दिले होते.

उपलब्ध पत्रानुसार, संबंधित माहितीमध्ये प्रशासकीय मान्यता, कार्यारंभ आदेश, मोजमाप पुस्तिका (एम.बी.), टेस्ट रिपोर्ट, पूर्णत्वाचे दाखले तसेच इतर आवश्यक कागदपत्रे लेखी स्वरूपात सादर करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते.

यापूर्वी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब किसनराव गायकवाड यांनी माहिती देण्याबाबत लेखी निवेदन दिले होते. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनीही संबंधित प्रकरणाची गंभीर दखल घेत गटविकास अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचा उल्लेख पत्रात आहे. तसेच सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

मात्र, तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित माहिती आजतागायत पूर्णपणे उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या लेखी आदेशांचे पालन झाले की नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

या प्रकरणावरून तालुक्यात विविध चर्चांना उधाण आले असून, अनेक वर्षांपासून संबंधित ग्रामसेवकांविरोधात विविध तक्रारी असल्याचेही तक्रारदारांचे म्हणणे आहे. माहिती देण्यास होत असलेल्या विलंबामागे नेमके कारण काय? शासनाच्या पारदर्शक कारभाराला अडथळा निर्माण होत आहे का? तसेच कोणाचे राजकीय अथवा प्रशासकीय पाठबळ आहे का? असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. मात्र, या आरोपांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.

दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते आणि तक्रारदार बाळासाहेब गायकवाड यांनी संबंधित ग्रामसेवकांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करून निलंबनाची मागणी केली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लेखी आदेशांनंतरही माहिती उपलब्ध होत नसल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी कठोर भूमिका घ्यावी, अशी त्यांची मागणी आहे.

तसेच, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांची अंमलबजावणी वेळेत झाली नाही, तर पंचायत समितीसमोर ग्रामस्थांच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला असल्याचे सांगण्यात येत आहे.

**प्रशासनाकडे नागरिकांची अपेक्षा**


ग्रामपंचायत स्तरावरील विकासकामांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि माहितीचा अधिकार यांचे पालन होणे ही लोकशाही व्यवस्थेची मूलभूत गरज आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणात वस्तुस्थिती स्पष्ट करून नागरिकांना माहिती उपलब्ध करून देणे, तसेच आवश्यक असल्यास नियमांनुसार पुढील प्रशासकीय कार्यवाही करणे, अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

## साक्षी किरण पोकळे हिचे कॉम्प्युटर इंजिनिअरिंगमध्ये घवघवीत यश

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील ज्येष्ठ पत्रकार किरण पोकळे व माजी पंचायत समिती सदस्या कमल पोकळे यांची कन्या साक्षी किरण पोकळे हिने पुणे येथील मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधून कॉम्प्युटर इंजिनिअरिंगच्या अंतिम परीक्षेत ९.०७ सीजीपीए गुणांसह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आष्टी तालुक्यासह विविध स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

साक्षी ही पत्रकार प्रविण पोकळे यांची पुतणी आहे.साक्षीने सन २०२२ मध्ये मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे येथे कॉम्प्युटर इंजिनिअरिंग शाखेत प्रवेश घेतला होता. चार वर्षांच्या शैक्षणिक प्रवासात सातत्यपूर्ण अभ्यास, अथक मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या बळावर तिने हे यश मिळविले. तिच्या गुणवत्तापूर्ण कामगिरीमुळे कुटुंबासह आष्टी तालुक्याचेही नाव उज्ज्वल झाले आहे.



तिच्या या यशाबद्दल आमदार सुरेश धस, युवा नेते जयदत्त धस, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रजजान तांबोळी, संचालक संजय मेहेर, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक तसेच अनेक मान्यवरांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. साक्षीच्या आजी जनाबाई राम पोकळे व ज्योती प्रविण पोकळे यांनीही नातीला आशीर्वाद देत श्रावणी व समर्थ यांनी तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

साक्षीचा मोठा भाऊ शिवम किरण पोकळे हाही अभियंता असून पुणे येथील विप्रो कंपनीत कार्यरत आहे. पोकळे कुटुंबातील मुलगा आणि मुलगी या दोघांनीही अभियांत्रिकी क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केल्याने कुटुंबाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. यावेळी भावना व्यक्त करताना ज्येष्ठ पत्रकार किरण पोकळे म्हणाले, माझा मुलगा शिवम पुण्यातील विप्रो कंपनीत इंजिनिअर म्हणून कार्यरत आहे. आता मुलगी साक्षीनेही ९.०७ सीजीपीए गुणांसह प्रथम श्रेणीत यश मिळवून आमचे नाव उंचावले आहे. दोन्ही मुलांनी शिक्षणाच्या जोरावर घेतलेली ही भरारी पाहून पालक म्हणून आमच्या आयुष्याचे खरे सार्थक झाल्याची भावना मनात आहे. हे यश त्यांच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फळ आहे.

पान ६ वरुन...

### २४ कोटींच्या 'माता व बाल'

गळती, लिफ्ट बिघाड; आता वॉटर फिल्टरही बंद

या नव्या इमारतीच्या उद्घाटनापूर्वीच छताला गळती लागून पीओपी कोसळल्याच्या घटना घडल्या होत्या. तसेच लिफ्ट वारंवार बंद पडल्याने रुग्ण आणि नातेवाईक अडकून पडल्याचे प्रकारही समोर आले. काही प्रसंगी रुग्णांना झोळीतून वरच्या मजल्यावर नेण्याची वेळ आली होती. आता वॉटर फिल्टर बंद पडल्याने पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण झाला असून, रुग्णालयातील मूलभूत सुविधांच्या देखभालीबाबत प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याची मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

### नीट परीक्षेत आष्टीच्या श्रावणी

श्रावणीने शालेय जीवनापासूनच वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे ध्येय निश्चित केले होते. नियोजनबद्ध अभ्यास, सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे प्रोत्साहन याच्या बळावर तिने हे दैदिप्यमान यश मिळविले आहे.श्रावणीच्या या गुणवत्तेमुळे देशातील प्रतिष्ठित एम्स (-खखचड) संस्थेत वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. डॉक्टर बनून समाजसेवा करण्याचे तिचे स्वप्न असून, त्या दिशेने तिने यशस्वी पाऊल टाकले आहे.श्रावणीच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, पालक, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच आष्टी तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तिच्या यशामुळे बेलगाव गावासह संपूर्ण आष्टी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

### मोठेवाडीत राष्ट्रवादी काँग्रेस

पक्षाची विचारधारा प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी जोमाने काम करण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

बैठकीत विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले तसेच मोहन जगताप यांचे नेतृत्व अधिक बळकट करण्याचा संकल्प व्यक्त केला. बूथ संपर्क दौऱ्यामुळे मोठेवाडी परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या बैठकीस विधानसभा प्रमुख संतोष यादव, नगरसेवक शरद यादव, नगरसेवक गटनेते इम्रान खान, नगरसेवक भागवत भोसले, नगरसेवक गोविंद इतापे, सरपंच भालचंद्र सोळंके, युवक अध्यक्ष राज अर्जुन,ड. संभाजी होके, गणेश रांजवण, फेरोज इनामदार, मौजम कुरेशी, विनोद गोपाळ, विनोद ढगे, आकाश खामकर यांच्यासह गावातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि प्रमुख नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राष्ट्रवादी काँग्रेसचे

त्यामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि युवकांनी पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन या आंदोलनात बहुसंख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सतीश शिंदे यांनी केले. या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी, युवक, पालक तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

### छत्रपती शिवाजी महाराजांचा

काळे,किरण ज्ञानेश्वर ढेरे,सुहास परमेश्वर काळे, दिलीप पंडितराव काळे, ज्ञानेश्वर श्रीमंत काळे यांना पोलिसांनी अटक केली होती.

दरम्यान, सर्व शिवप्रेमींनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) कलम ४८३ अंतर्गत जामिन साठी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. आरोपीच्या वतीने ॲड. राहुल खुणे यांनी प्रभावी व जोरदार युक्तीवाद मांडला सदरील युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीचा जामीन अर्ज मंजूर करण्यात आला.

### न्यायालयाकडून इंडियन मेडिकल

वातावरण द्यावे अन्यथा यानंतर बेमुदत खासगी व सरकारी दवाखाने बंद असे आंदोलन राबविण्यात येईल असा इशारा संघटनेने दिला आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनने माननीय न्यायालयाचे आभार व अभिनंदन करीत डॉक्टरांच्या सुरक्षिततेविषयी प्रचलित अस्तित्वात असणारा मेडिकेअर कायद्याची अंमलबजावणी कठोरपणे करावी याविषयी सरकारला प्रशासनाला कडक निर्देश द्यावे अशी विनंती केली आहे.

### मोकाट जनावरे आणि वराहांचा

पिकांचे नुकसान तर होतच आहे, शिवाय शेतामध्ये मोठ्या प्रमाणात घाण करून शेतीची अवस्था बिकट केली जात आहे.

शेतकऱ्यांनी या गंभीर समस्येबाबत नगरपंचायतीकडे वारंवार तक्रारी व सूचना करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आता तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, एकीकडे शेतीसाठी वाढता खर्च, अनिश्चित पाऊस आणि दुसरीकडे मोकाट जनावरांचा उपद्रव यामुळे शेती करणेच अवघड बनले आहे. दिवस-रात्र शेताची राखण करूनही जनावरे पिकांवर ताव मारत असल्याने आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

नगरपंचायतीने तातडीने मोकाट जनावरे व वराहांचा बंदोबस्त करावा. अन्यथा प्रभाग क्रमांक १५ व १६ मधील सर्व शेतकरी नगरपंचायतीच्या दारात धरणे आंदोलन छेडतील, असा इशारा शेतकरी किशोर धोंडे, लक्ष्मण रेडेकर, भाऊ माने, छोटू वाल्हेकर यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी दिला आहे.

शेतकऱ्यांच्या या संतप्त भूमिकेमुळे आता नगरपंचायत प्रशासन या प्रश्नाकडे किती गांभीर्याने पाहते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे. जर तातडीने उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, तर येत्या काही दिवसांत शेतकऱ्यांचा रोष तीव्र आंदोलनाच्या स्वरूपात उफाळून येण्याची चिन्हे आहेत.

## महिला बचत गटातील सदस्यांसाठी पीएमएफएमई योजनेंतर्गत प्रशिक्षण व प्रमाणपत्र वाटप -बनसोडे

बीड । प्रतिनिधी

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग (झचऋचए) योजनेअंतर्गत बीज भांडवल कर्जाचा लाभ घेतलेल्या महिला बचत गटातील सभासदांसाठी तीन दिवसीय अनिवासी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी या कार्यक्रमास नगराध्यक्ष प्रेमलता ताई पारवे व नगरसेविका आरती रंजित बनसोडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले व नगराध्यक्ष प्रेमलता पारवे यांनी कौतुक करत रोजगार निर्मितीसाठी सदरील समितीस प्रयत्नशील राहील तसेच



राज्यस्तरीय तांत्रिक संस्था तथा कृषी विज्ञान केंद्र, बारामती यांच्या पत्रानुसार, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत महिला बचत गटातील सदस्यांना अन्नप्रक्रिया व्यवसाय उभारणीसाठी बीज भांडवल कर्ज उपलब्ध करून दिले जाईल . या लाभार्थी महिलांना उद्योग व्यवस्थापन, अन्नप्रक्रिया, विपणन, गुणवत्ता नियंत्रण आणि व्यवसाय कौशल्याबाबत प्रशिक्षण देण्याची तरतूद आहे.

याच अनुषंगाने बीड नगरपरिषद सभागृहात दि. १५ जुलै २०२६ ते १७ जुलै या कालावधीत प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. तसेच प्रशिक्षणासाठी संबंधित बचत गटांतील सर्व सभासद उपस्थित होते याची दक्षता घेऊन प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अनुपालन अहवाल सादर करण्याचीही सूचना करण्यात आली आहे.नगरसेविका आरती रंजित बनसोडे यांनी सांगितले की, या प्रशिक्षणामुळे महिला बचत गटातील सदस्यांना अन्नप्रक्रिया उद्योगाविषयी आवश्यक तांत्रिक ज्ञान, व्यवसाय कौशल्य आणि शासनाच्या योजनांचा प्रभावी लाभ घेता येईल. त्यामुळे महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास आणि स्वयंरोजगाराला चालना मिळण्यास मदत होणार आहे. असे सभापती आरती रंजीत बनसोडे यांनी म्हटले आहे.. हा कार्यक्रम आमदार विजयसिंह पंडित तसेच उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

## सरकारला सत्तेची मस्ती; हि मस्ती जनताच जिरवणार- राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

देशात लोकशाहीची वाटचाल हुकूमशाही कडे चाललेली आहे. लेकराचे भविष्य घडवणाऱ्या नीट परीक्षेमध्ये भ्रष्टाचार करून अनेक लेकराच्या भविष्याचा वाटोळ करणाऱ्या शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा घेण्यात यावा याकरिता उपोषणाला बसलेल्या सोनम वांगचुक यांची उचल बांगडी करणे ही सरकारला असलेली सत्तेची मस्ती होय सरकारला असलेली सत्तेची मस्ती जनताच जिरवणार असे भावना शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी व्यक्त केल्या आहेत



देशाचा भवितव्य घडवणाऱ्या नीट परीक्षेत घोळ घालणाऱ्या दळभद्री शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान याचा राजीनामा घेण्या ऐवजी सरकारने देशहितासाठी देशातील लेकराच्या भविष्यासाठी लढणाऱ्या सोनम वांगचुक यांची उचल बांगडी करणे ही अतिशय दुर्दैवी प्रकार आहे. शेतकरी हक्क मोर्चा अशा या दुर्दैवी प्रकारचा जाहीर निषेध करतो. सोनम वांगचुक यांच्या लोकशाही लढा सोबत आहे असे शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी प्रसिद्धी पत्रक प्रसिद्धीस दिले आहे. दिल्ली येथे झालेला प्रकार हा लोकशाहीसाठी अतिशय घातक आहे लोकशाहीची वाटचाल ही हुकूमशाही कडे चालवलेली आहे. देशामध्ये परीक्षेचे पेपर फुटतात नोकर भरतीचे पेपर फुटतात.चीन भारताची जमीन बळकावली. नरेंद्र मोदी मुळे देशातील सर्वसामान्य जनतेचा सरकार वरील विश्वास उडालेला आहे यामुळे शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने या घटनेचा जाहीर निषेध करून शेतकरी हक्क मोर्चा हा सोनम वांगचुक यांच्यासोबत आहे असे प्रसिद्धी पत्र शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने राजेंद्र आमटे यांनी प्रसिद्ध दिले

## पंकजाताई मुंडे यांच्या मांजरसुंबा येथील जनसंपर्क कार्यालयास सदिच्छा भेट; कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य

मांजरसुंबा । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय नेत्या तथा महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री आदरणीय लोकनेत्या पंकजाताई साहेब मुंडे यांनी मांजरसुंबा येथील भाजप बालाघाट जनसंपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी आपला वाढदिवस भाजप तालुकाध्यक्ष अशोक रसाळ यांच्या कुटुंबीय, कार्यकर्ते व मित्रपरिवारासोबत साजरा करून आनंद द्विगुणित केला. यावेळी अशोक रसाळ यांचे चिरंजीव ओमराज यांच्या प्रथम वाढदिवसानिमित्त पंकजाताई साहेबांनी केक कापून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत आशीर्वाद दिला. ताईसाहेबांनी दाखवलेल्या या आपुलकीमुळे रसाळ कुटुंबीय तसेच मित्रपरिवार भावूक झाला. हा अविस्मरणीय क्षण आयुष्यभर स्मरणात राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

**गोरगरीब महिलांसाठी साडी वाटप उपक्रमाचा शुभारंभ**

आदरणीय पंकजाताई साहेब मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त दि. २६ जुलै रोजी भाजप बालाघाट मंडळाच्या वतीने गोरगरीब व गरजू महिलांना साडी वाटपाचा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा शुभारंभ पंकजाताई साहेबांच्या हस्ते करण्यात आला. समाजातील गरजू घटकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे ताईसाहेबांनी कौतुक केले.

**ताईसाहेबांना दिली कुटुंबाच्या जुन्या आठवणींची अनमोल भेट**

यावेळी पंकजाताई साहेबांच्या आई-वडिलांसोबत व बहिणींसोबतचा जुना, दुर्मीळ कौटुंबिक छायाचित्र असलेला फोटो अशोक रसाळ




यांच्या वतीने ताईसाहेबांना प्रेमपूर्वक भेट देण्यात आला. हा फोटो पाहताना ताईसाहेबांच्या चेहऱ्यावर जुन्या आठवणींचा भावनिक स्पर्श दिसून आला. स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब आणि कुटुंबीयांच्या जुन्या आठवणींना उजाळा देणारी ही अनमोल भेट ताईसाहेबांसाठी भावनिक ठरली.

**नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या**

जनसंपर्क कार्यालयाच्या भेटीदरम्यान परिसरातील नागरिकांनी मांडलेल्या विविध समस्या व प्रश्न ताईसाहेबांनी आत्मीयतेने जाणून घेतले. नागरिकांची निवेदने स्वीकारून त्यांच्या अडचणी समजून घेत सर्वसामान्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सकारात्मकपणे प्रयत्न करण्याचा विश्वास त्यांनी दिला. यावेळी त्यांनी नागरिकांशी मनमोकळेपणाने संवाद साधत त्यांच्या सुख-दुःखाची आस्थेने विचारपूस केली. अशोक रसाळ यांच्या जनसंपर्क कार्यालयास पंकजाताई मुंडे यांनी दिलेली भेट ही केवळ औपचारिक भेट न राहता, कार्यकर्त्यांच्या पाठीशी नेतृत्व खंबीरपणे उभे असल्याचा विश्वास देणारी ठरली. ताईसाहेबांच्या या भेटीमुळे बालाघाट मंडळातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणि उत्साह निर्माण झाला. यावेळी पंकजाताई साहेबांनी अशोक रसाळ यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांशी असलेला त्यांचा सातत्यपूर्ण संपर्क, जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी सुरू असलेले काम आणि कार्यकर्त्यांशी असलेली नाळ यांचे कौतुक केले. एक विश्वासू जनसेवक म्हणून अशोक रसाळ यांचे काम उल्लेखनीय असून, जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी ते सातत्याने कार्यरत आहेत, अशा शब्दांत त्यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच, यापुढील काळातही जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी ठामपणे उभे राहून काम करत राहा. आपल्या कार्याला माझे सदैव सहकार्य आणि ताकद राहील, असा विश्वास पंकजाताई साहेबांनी अशोक रसाळ यांना दिला. पंकजाताई साहेबांच्या या भेटीने बालाघाट मंडळातील भाजप कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा मिळाली असून, आगामी काळात जनसामान्यांच्या सेवेसाठी अधिक जोमाने आणि ताकदीने कार्य करण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# बियाणे विक्रेत्यांचा बेमुदत आंदोलनाचा इशारा

पुणे / प्रतिनिधी

राज्यभरात सोयाबीन बियाण्यांच्या उगवण न झाल्याच्या वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर बियाणे विक्रेते आक्रमक झाले आहेत. बियाण्यांच्या गुणवत्तेची शहानिशा न करता तक्रारी दाखल केल्या जात असल्याने विक्रेत्यांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याचा दावा करत त्याविरोधात बेमुदत आंदोलन छेडण्याचा इशारा 'महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टीसाइड्स अँड सीड्स डीलर्स असोसिएशन'ने (माफदा) दिला आहे.

'माफदा'चे अध्यक्ष विनोद तराळ पाटील आणि सरचिटणीस विपिन कासलीवाल यांनी कृषी आयुक्त सूरज मांढरे यांना पत्र पाठवून विक्रेत्यांची भूमिका मांडली आहे. या पत्रानुसार, बियाणे कंपन्यांकडून वेष्टणबंद स्वरूपात येणारा माल विक्रेते शेतकऱ्यांना विकतात. त्यामुळे बियाण्यांच्या गुणवत्तेतील त्रुटींसाठी विक्रेत्यांना जबाबदार धरणे योग्य नसल्याचा



दावा करण्यात आला आहे. पत्रात नमूद केल्याप्रमाणे, एका लॉटमध्ये सुमारे ५०० बियाण्यांच्या पिशव्या असतात. काही लॉटमध्ये अडीच टक्क्यांपर्यंत उगवण क्षमतेबाबत तक्रारी येऊ शकतात. मात्र उगवण ही पाऊस, पेरणीची वेळ, जमिनीचा प्रकार आणि अन्य परिस्थितींवरही अवलंबून असते. असे असताना उगवण झालेल्या शेतकऱ्यांकडूनही तक्रारी दाखल होत असल्याचा दावा माफदाने केला आहे. माफदाने तक्रार प्रक्रियेत बदल करण्याची मागणीही केली आहे. त्यानुसार, तक्रार दाखल करताना भौगोलिक स्थान (जिओ-टॅग) असलेली छायाचित्रे जोडणे सक्तीचे करावे, आवश्यक कागदपत्रांची मागणी विक्रेत्यांऐवजी संबंधित बियाणे कंपनीकडून व्हावी, तक्रारींसाठी स्वतंत्र संकेतस्थळ तयार करावे, प्रत्यक्ष पडताळणीनंतरच तक्रार ग्राह्य धरावी आणि खोटी तक्रार करणाऱ्यांना दोन वर्षांसाठी तक्रार करण्यास बंदी घालावी. सोयाबीन बियाणांसंदर्भातील कारवायांत झालेली वाढ आणि शेतकऱ्यांचा वाढलेला रोष, या पार्श्वभूमीवर विक्रेत्यांनी 'माफदा'ला भूमिका घेण्याचा आग्रह धरला होता.



## पैसा किड व त्यावरील नियंत्रण

सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद पिकावर मिलीपेड्स म्हणजेच पैसा किंवा वाणी या किडीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी प्रभावी दिर्घ मुदतीचे उपाय योजावेत आणि लक्षणे ओळखून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने सुचविलेल्या पुढील उपाययोजनांचा अवलंब करावा.

नुकसान : मिलीपेड्स हे निशाचर असून सामान्यतः सडणारी पाने, कुजलेले लाकूड आणि इतर प्रकारच्या ओलसर, किडणा-या वनस्पती खातात. साधारणपणे त्यांची भुमिका कुजलेल्या झाडाचे विघटन करण्यास मदत करणारी आहे. परंतु जेव्हा ते असंख्य होतात तेव्हा ते जमिनीवर संपर्कात येणा-या रोपटे, बियाणे जसे कापूस, सोयाबिन या सारख्या पिकाचे नुकसान करतात. जमिनीलगत रोपे कापून टाकतात कालांतराने रोपावर जाऊन पाने कुरतडतात.

असे करा व्यवस्थापन : मिलीपेडचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी प्रभावी दिर्घ मुदतीचा उपाय म्हणजे शेतातील आर्द्रता आणि लपण्याची ठिकाणे कमी करुन बांधावरिल गवत, दगड, जमिनीवर ठेवलेल्या वस्तू काढाव्यात. बऱ्याचदा आर्द्र, घनदाट पिकात जास्त पाणी दिल्यामुळे किंवा संध्याकाळी पिकात पाणी चालू ठेवल्यास मिलीपेड्सचा प्रादुर्भाव वाढतो. शेतातील पालापाचोळा किंवा वाळलेले कुजलेले पदार्थ गोळा करुन नष्ट करावेत. पैसा रात्री जास्त सक्रीय असल्याने रात्रीच्या वेळी शेतात गवताचे ढिग करुन ठेवावेत आणि सकाळी गवताच्या ढिगाखाली जमा झालेले मिलीपेड्स जमा करून मिठाच्या किंवा साबणाच्या द्रावणात टाकावेत. जास्त आर्द्रता व अन्नाचा पुरवठा नसल्यास काही दिवसातच मिलीपेड्स मरतात. ज्याठिकाणी शेतक-यांनी पेरणीपुर्वी बियाण्याला बिजप्रक्रीया केली आहे तेथे प्रादुर्भाव कमी आढळून आलेला आहे. पिकामध्ये वेळेवर कोळपणी करावी त्यामुळे जमिनीतील अंडी व लपून बसलेल्या पैसा किडी उघडया पडून नष्ट होतील. चांगला पाऊस पडल्यास या किडींचे नैसर्गीक नियंत्रण होते.

रासायनिक नियंत्रण : किड संपूर्ण शेतात पसरलेली असल्यास क्लोरपायरीफॉस (२० ईसी) ३ मिली किंवा क्लोरपायरीफॉस ५० टक्के + सायपरमेथ्रीन (५ टक्के एसपी) १.५ मिली प्रति लीटर या प्रमाणे फवारणी करावी. सदर कीडनाशकाची शिफारस मिलीपेडसाठी नाही, मात्र कापूस पिकासाठी आहे. कार्बोसल्फान (६ टक्के दानेदार) किंवा क्लोरपायरीफॉस (१० टक्के दानेदार) किंवा फिप्रोनिल (०.३ टक्के) ५ किलो प्रति १०० किलो शेणखतात मिसळून ओळीने शेतातील रोपा जवळ वापरावे. सदरील कीटकनाशके परिणामकारक आहेत परंतु लेबल क्लेम नाहीत.

## दूध उत्पादनात वाढ करायचीये; पौष्टिक चाऱ्यासाठी वापरा हे तंत्र!

राज्यात धान लागवडीखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. अनके शेतकरी धान शेतीसोबतच दुग्ध व्यवसाय देखील करत असतात. धान काढणीनंतर शेतकरी धानाचा शेतातील पेंढा जाळून टाकतात. मात्र धानाच्या काढणीननंतर मागे राहिलेल्या पेंढ्यांची कुट्टी करून दुधाळ जनावरांना चारा म्हणून वापरल्यास, मोठया प्रमाणात चारा तर उपलब्ध होणार आहेच. याशिवाय धानाच्या पेंढ्यातील पौष्टिक घटकांमुळे दुधाळ जनावरांच्या दूध उत्पादनात वाढ देखील केली जाऊ शकते. त्यामुळे धानाचा पेंढा हा दुधाळ जनावरांचे दूध वाढवण्यासाठी खूप महत्तवपूर्ण मानला गेला आहे.




धानाच्या पेंढ्यातील पोषकतत्वे : आपल्या देशात कोरड्या चाऱ्याची नेहमीच २३.४ टक्क्यांपर्यंत तर ओल्या चाऱ्याची ११.२४ टक्क्यांपर्यंत कमतरता जाणवत असते. अशा वेळी शेतकऱ्यांनी उन्हाळी दिवसांसाठी धानाची कुट्टी करून, त्यास व्यवस्थित साठवून ठेवणे खूप गरजेचे असते. धानाच्या कुट्टी अर्थात भुसामध्ये कोरड्या घटकांचे प्रमाण ९० टक्के तर १० टक्के ओलावा असतो. याशिवाय धानाच्या भुसामध्ये ३ टक्के प्रोटीन आणि ३० टक्के फायबरचे प्रमाण असते. याशिवाय धानाच्या कुट्टीमध्ये १७ टक्के सिलिका आढळून येते. यात अर्धा टक्के कॅल्शियम, ०.१ टक्के फॉस्फरस देखील आढळून येते. तथा धानाच्या कुट्टीमध्ये पचनशक्ती ३० ते ५० टक्के इतकी असते. ज्यामुळे दूध उत्पादनात वाढ होण्यास मोठी मदत होते. दूध उत्पादक शेतकऱ्यांनी भाताच्या पेंढ्यासोबतच दुधाळ जनावरांना अन्य चारा घालणे देखील महत्वाचे असते.

कुट्टीमध्ये मिसळा 'या' गोष्टी : धानाच्या कुट्टीची किंवा भुसाची पचनशक्ती वाढण्यासाठी, त्यात यूरिया (अमोनिया) मिक्स करावा. यासाठी १०० किलोग्रॅम धान कुट्टीसाठी ३३ लीटर पाणी आणि ४ किलोग्रॅम यूरियाचे मिश्रण करून ते कुट्टीमध्ये मिश्रित किंवा शिंपडून मिक्स करावे. ज्यामुळे दुधाळ जनावरांच्या दूध उत्पादनात वाढ होण्यासाठी खूप मदत होते. कुट्टीवर युरियाचे मिश्रण शिंपल्यानंतर साधारणपणे २१ दिवसांपर्यंत असा चारा झाकून ठेवावा. २१ दिवसानंतर युरिया खत हे अमोनिया वायूमध्ये परावर्तित होऊन ते धानाच्या कुट्टीची पौष्टिकता आणखी वाढवेल. याशिवाय अशी युरिया उपचारीत कुट्टी जनावरांना पचनासाठी देखील उत्तम असते. इतकेच नाही तर युरियाच्या या शिडकाव्यामुळे धानाच्या कुट्टी किंवा भुसातील जिवाणू देखील नष्ट होऊन जातात. अर्थात यामुळे दुधाळ जनावरांना आरोग्यदायी आहार मिळून दूध उत्पादनात भरघोस वाढ होण्यास मदत होते.

## भेंडीवरील मावा कीड

भेंडी हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे भाजीपाला पीक आहे. या पिकाच्या वाढीच्या सुरुवातीपासून ते फळधारणेपर्यंत मावा या रसशोषक किडीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो. ही कीड पानांच्या खालच्या बाजूस व कोवळ्या शेंड्यांवर वसाहती करून पेशीरस शोषते. त्यामुळे पाने पिवळी पडतात, सुरकुततात आणि झाडाची वाढ खुंटते. याशिवाय, या किडीमुळे मोझॅक विषाणूजन्य रोगाचाही प्रसार होतो. परिणामी, उत्पादनाबरोबरच फळांचा दर्जाही खालावतो.




किडीमुळे होणारे नुकसान : पिले व प्रौढ मावा पानांच्या खालच्या बाजूस, कोवळ्या शेंड्यांवर, कळ्यांवर व फळांवर वसाहती करून पेशीरस शोषतो. त्यामुळे पाने पिवळी पडून सुरकुततात, वाकडी होतात आणि वाढ खुंटते. मावा स्रवणाऱ्या मधुरसावर काळी बुरशी वाढल्याने प्रकाशसंश्लेषणात अडथळा येतो. ही कीड मोझॅक या विषाणूजन्य रोगाचा प्रसार करून मोठे आर्थिक नुकसान करते. पिलावस्था : आकार ०.५ ते १.० मि.मी.; रंग फिकट पिवळसर-हिरवा ते हलका हिरवा असतो. उष्णता किंवा गर्दीत रंग गडद हिरवा अथवा करडसर होतो. डोके लहान, शृंगिका शरीरापेक्षा लहान आणि सायफंक्युली किंचित गडद असतात. पंखविरहित प्रौढ : शरीराची लांबी ०.९ ते १.८ मि.मी. असते. रंग काळसर ते गडद हिरवा असून त्यावर फिकट हिरव्या छटा दिसतात. उष्ण हवामानात कीड आकाराने लहान व पांढरट-पिवळसर दिसते. सायफंक्युली गडद व कौडापेक्षा लांब असतात. कौडा फिकट असून, त्यावर ४ ते ८ केस आढळतात पंखधारी प्रौढ : दोन जोड्या पारदर्शक पंख असून पुढील पंख मागील पंखांपेक्षा मोठे असतात. डोके व छाती गडद तपकिरी ते काळसर, तर पोट फिकट असते. शृंगिका शरीराएवढ्या किंवा त्यापेक्षा लांब असतात. ही अवस्था नवीन झाडांवर प्रसार करून नवीन वसाहती स्थापन करते. जीवनक्रम : पंखयुक्त व पंखरहित माव्यामध्ये अलैंगिक व पिले देणारे प्रजनन आढळते. एक मादी दररोज ८ ते २२ पिल्लांना जन्म देते. पिल्ले चार वेळा कात टाकून ४ ते ७ दिवसांत प्रौढ होतात. प्रौढ अवस्था ९ ते १२ दिवस, तर पिल्ले देण्याचा कालावधी ७ ते ८ दिवसांचा असतो. संपूर्ण जीवनक्रम १३ ते १८ दिवसांत पूर्ण होतो.

व्यवस्थापन : अतिप्रादुर्भाव झालेल्या कोवळ्या शेंडा व पानांचा भाग काढून नष्ट करावा. नत्रयुक्त खतांचा संतुलित वापर करावा व त्याचा अतिवापर टाळावा. शेतात हेक्टरी २५ ते ३० पिवळे चिकट सापळे लावून किडीचे निरीक्षण व नियंत्रण करावे. क्रायसोपा, सिरफिड माशी, ढालकीटक यांसारख्या मित्र कीटकांचे संवर्धन करून त्यांचे संरक्षण करावे. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून अ‍ॅझाडिरॅक्टीन (३०० पीपीएम) ५ मि.लि. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## जनावरांना होणारा जिवघेणा फऱ्या रोग आणि त्यावरील उपाय!

महाराष्ट्रातील दूध उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात दुधाचे उत्पादन घेतले जाते. मात्र डेअरी व्यवसाय करताना जनावरांच्या आहारासोबतच त्यांच्या आरोग्याकडे देखील लक्ष देणे तितकेच आवश्यक असते. दुधाळ जनावरांना शेतकरी खूप जपत असतात. मात्र, कधी-कधी जनावरांकडे दुर्लक्ष झाल्यास, ते अनेक आजारांचे शिकार होतात. जनावरांना होणारा 'फऱ्या रोग' हा देखील त्यापैकीच एक आहे. 'फऱ्या रोग' हा जनावरांना होणारा जीवघेणा आजार असून, त्याच्यामुळे शेतकऱ्यांचे दुधाळ जनावर दगावण्याची देखील भीती असते. त्यामुळे हा आजार नेमका काय आहे? या आजाराची लक्षणे काय आहेत? आणि या आजारावर नेमके काय उपाय आहेत? याबाबत सविस्तरपणे जाणून घ्या

कसा होतो 'फऱ्या रोग' :फऱ्या रोगास प्रामुख्याने अवकाळी पाऊस किंवा पावसाळ्याच्या दिवसांमध्ये जनावरे बळी पडतात. हा रोग मातीमध्ये असलेल्या क्लोस्ट्रीडियम चाउवोई या जिवाणूमुळे जनावरांना होतो. हा जिवाणू मातीमध्ये वर्षानुवर्षे जिवंत असतो. पाऊस झाल्यानंतर जनावरास शरीरावर किंवा पायांना थोडी जरी जखम होऊन रक्त निघालेले असेल तर मातीमधील हा जिवाणू त्या जखमेच्या ठिकाणाहून जनावरास बाधित करतो. अशा अवकाळी पावसाच्या कालावधीमध्ये शेतकऱ्यांनी आपल्या



दुधाळ जनावरांना जपणे हा त्यावरील सर्वोत्तम उपाय आहे. इतकेच नाही तर पावसाळ्याच्या दिवसांमध्ये देखील जनावरांमध्ये या रोगाचा प्रादुर्भाव अधिक असल्याचे पाहायला मिळते.

हे आहेत या रोगाची लक्षणे :जनावरांना हा फऱ्या रोग झाल्यास त्यांचे शरीराचे तापमान १०७ डिग्रीपर्यंत पोहचते. अर्थात जनावरास तीव्र ताप येतो. या आजारात संबंधित जनावर चारा किंवा पाणी पिणे सोडते. याशिवाय हा रोग झालेल्या जनावराचे सर्व मागील पुढील पाय सुजतात. ज्यामुळे संबंधित दुधाळ जनावर हे लंगडत चालते. किंवा मग अशा जनावरास सुजलेल्या पायांमुळे कधी-कधी चालता देखील येत नाही. कारण या आजारामुळे जनावरास सर्वात जास्त त्रास हा पायांना होत असतो. कधी-कधी या फऱ्या रोगामुळे संबंधित जनावराचा दोन किंवा तीन दिवसांमध्ये मृत्यू देखील होतो.

आजारावरील उपाय : जनावरांना होणारा फऱ्या हा असा रोग आहे. जो झाल्यास संबंधित जनावरावर उपचार करणे खूप कठीण असते. ज्यामुळे दूध उत्पादकांनी अवकाळी पाऊस किंवा पावसाच्या वातावरणात आपल्या जनावरांची काळजी घेणे हाच त्यावरील सर्वोत्तम उपाय आहे. लक्षणे दिसताच आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात जाऊन तात्काळ या रोगाचा इलाज व लसीकरण करून घ्यावे. जेणेकरून अशा जनावरास अधिक त्रास न होता. ते लवकर बरे होण्यास मदत होईल. याशिवाय आजारावर वेगवेगळ्या प्रकारच्या मृत लसी उपलब्ध आहेत. तीन ते सहा महिन्याच्या वासरांना प्राथमिक लसीकरण करावे. रोगकारक शक्ती अधिक सशक्त होण्याकरिता चार महिन्यांनी दुबार लसीकरण करावे. दोन वर्षावरील जनावरांना पावसाळ्यापूर्वी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने दरवर्षी प्रत्येक जनावराला लसीकरण करावे. आजाराचा प्रादुर्भाव मेंढ्यांमध्ये सुद्धा दिसून येतो. गाभण मेंढ्यामध्ये प्रसूतीच्या एक महिन्या आधी लसीकरण करावे. बाधित जनावरास निरोगी जनावरांपासून पासून वेगळे करावे. त्वरित औषधोपचार सुरु करावेत. गोठ्यातील पृष्ठभाग जाळून घ्यावा.गोठा नियमित स्वच्छ ठेवावा. जनावरांना दलदलयुक्त भागात चरण्यास सोडू नये. मृत्यू झालेल्या जनावरांना खोल खड्डा करून पुरावे किंवा जाळून टाकावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८३७ : व्हिक्टोरिया इंग्लंडच्या राणीपदी
१८४० : सॅम्युअल मोर्स यांना टेलिग्राफ चा पेटंट मिळाला.
१८६३ : वेस्ट व्हर्जिनिया अमेरिकेचे ३५ वे राज्य बनले.
१८७७ : अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल यांनी कॅनडा मध्ये जगातील पहिल्या व्यावसायिक दूरध्वनी सेवेची सुरवात केली.
१८८७ : देशातील सर्वाधिक गर्दीचे स्टेशन व्हिक्टोरिया टर्मिनस (सध्याचे नाव सी. एस. टी.) सुरू झाले.
१८९९ : केंब्रिज विद्यापीठाच्या 'ट्रायपॉस' या गणिताच्या अंतिम परीक्षेत रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे पहिल्या वर्गात पहिले आल्यामुळे त्यांना सिनिअर रँग्लर होण्याचा बहुमान मिळाला.
१९२१ : टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना
१९६० : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची स्थापना
१९९० : ७.४ मेगावॅटचा भूकंपात इराण मध्ये ५०,००० लोक ठार तर १,५०,००० पर्यंत जखमी झाले.
१९९७ : 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'तर्फे राज्यातील पहिली मुलींची सैनिकी शाळा पुण्याजवळ सुरू झाली.
२००१ : परवेझ मुशर्रफ पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष झाले.
२०१४ : प्रसिद्ध कवी केदारनाथ सिंह यांना ज्ञानपीठ पुरस्कार घोषित करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : प्रसिद्ध ब्रिटीश व्यापारी व राजकारणी सर एडवर्ड अल्बर्ट ससून यांचा जन्मदिन.
१८६९ : लक्ष्मणराव किर्लोस्कर किर्लोस्कर उद्योगसमुहाचे संस्थापक (मृत्यू: २६ सप्टेंबर १९५६)
१८७६ : भारतीय तेलगु भाषिक चित्रपट क्षेत्राच्या इतिहासातील प्रसिद्ध पहिले गीतकार चांदला केसावदासू यांचा जन्मदिन.
१९१५ : टेरेन्स यंग चिनी-इंग्लिश दिग्दर्शक आणि पटकथाकार (मृत्यू: ७ सप्टेंबर १९९४)
१९२० : मनमोहन अधिकारी लोकशाही पद्धतीने निवडण्यात आलेले नेपाळचे पहिले पंतप्रधान, कम्युनिस्ट नेते (मृत्यू: २६ एप्रिल १९९९)
१९३९ : रमाकांत देसाई जलदगती गोलंदाज व राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष (मृत्यू: २८ एप्रिल १९९८)
१९४८ : नौरूचे राष्ट्राध्यक्ष लुडविग स्कॉटी यांचा जन्म.
१९५२ : भारतीय लेखक आणि कवी विक्रम सेठ यांचा जन्म.
१९५४ : ॲलन लॅम्ब इंग्लिश क्रिकेटपटू
१९७२ : पारस म्हांब्रे क्रिकेटपटू
१९७६ : प्रसिद्ध भारतीय महिला कसोटी व एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू देविका पळशीकर यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६८ : हेन्रिच रॉथ जर्मनीतील संस्कृत विद्वान आणि धर्मप्रसारक (जन्म: १८ डिसेंबर १६२०)
१८३७ : विल्यम (चौथा) इंग्लंडचा राजा (जन्म: २१ ऑगस्ट १७६५)
१९१७ : अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ जेम्समेसन क्राफ्ट्स यांचे निधन.
१९३० : ब्रिटीश कालीन रामपूर रियासतचे नवाब हमीद अली खान बहादूर यांचे निधन.
१९७२ : साली प्रसिद्ध भारतीय भौतिकशास्त्रज्ञ प्रा. कोट्टरलाकोटा रंगधामा राव यांचे निधन.
१९८७ : जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक पद्मभूषण डॉ. सलीम अली यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८९६)
१९९७ : बासू भट्टाचार्य चित्रफट दिग्दर्शनाच्या पदार्पणातच राष्ट्रपती पुरस्कार मिळवणारे निर्माते व दिग्दर्शक (जन्म: १९३४)
१९९७ : वासुदेव वामन तथा 'भाऊसाहेब' पाटणकर ऊर्फ 'जिंदादिल' मराठीतले पहिले शायर (जन्म: ? ? १९०८)
२००७ : सुप्रसिद्ध भारतीय बंगाली चित्रपट अभिनेत्री अनिता गुहा यांचे निधन.
२००८ : चंद्रकांत गोखले अभिनेते (जन्म: ७ जानेवारी १९२१)
२००९ : पाकिस्तान देशाचे कीटकशास्त्रज्ञ, प्राध्यापक, अभिनेते आणि उद्योजक दतुक रहमान अन्वर सय्यद यांचे निधन.
२०१० : माजी भारतीय कसोटी क्रिकेटपटू गुंडीबाईल रामा सुंदराम यांचे निधन.
२०१३ : भारतीय पत्रकार डिकी रुतनागुर यांचे निधन. (जन्म: २६ फेब्रुवारी १९३१)
१९८७ : जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक डॉ. सलीम अली यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८९६)

## फळ पीकविमा योजनेत आता अंजिराचाही समावेश

पंतप्रधान पीकविमा योजनेत आता अंजीर पिकाचा समावेश करण्यात आला आहे. कृषी विभागाने मागील तीन वर्षांपासून केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. अंजीर पिकाला विम्याचे संरक्षण मिळणार असल्याने उत्पादकांनी समाधान व्यक्त केले आहे.

फळपीक विमा योजनेमध्ये चालू वर्षी केंद्र शासनाने इतर फळ पिकांप्रमाणेच अंजीर या फळ पिकाचा समावेश केल्याने उत्पादकांना नैसर्गिक आपत्तीत मोठा आधार मिळणार आहे. राज्यात हजारो हेक्टरवर अंजिराचे उत्पादन घेतले जाते. मात्र विमा कवच नसल्याने शेतकरी अडचणीत होते. या योजनेअंतर्गत मृग आणि आंबिया अशा दोन्ही बहारांना विमा संरक्षण मिळेल. शेतकऱ्यांना प्रति हेक्टर आठ हजार रुपये विमा हप्ता भरावा लागणार असून १ लाख ६० हजार रुपयांचे विमा संरक्षण मिळणार आहे. मृग बहारासाठी ३१ जुलैपर्यंत, तर आंबिया बहारासाठी १४ जानेवारी २०२७ पर्यंत अर्ज करता येईल. पावसाचा खंड, अति आर्द्रता आणि गारपीट यांसारख्या संकटांपासून यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टळणार आहे. पीकविम्याचा लाभ घेण्यासाठी डिजिटल क्रॉप सर्वे नोंदणी करणे गरजेचे. बँक खाते आधारला लिंक करणे, फार्मर आयडी असणे बंधनकारक. उत्पादनक्षम अंजीर बागेची जिओ टॅगिंग आवश्यक.



सोमवार दि.२० जुलै २०२६ ५

राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत



# पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक

## ५४७.९७ कोटी रुपयांच्या आराखड्याला मान्यता : विकासकामांना गती, निधीचा प्रभावी वापर आणि वेळेत अंमलबजावणीवर भर

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या सर्वांगीण आणि संतुलित विकासाला गती देण्यासाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी ५४७.९७ कोटी रुपयांच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत विविध विकासकामांचा आढावा घेण्यात आला. मंजूर कामे गुणवत्तापूर्ण व विहित मुदतीत पूर्ण करून उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करण्यावर भर देत, विकासकामांच्या अंमलबजावणीला अधिक गती देण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या. जिल्हा नियोजन समितीची बैठक आज जिल्हा नियोजन भवन येथे पार पडली. बैठकीस खासदार कल्याण काळे, आमदार सर्वश्री अर्जुन खोतकर, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, संतोष दानवे, हिकमत उढाण, विक्रम काळे, सुहास शिरसाठ, महापौर वंदना



मगरे, उपमहापौर राजेश राऊत, जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया, पोलिस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, महापालिका आयुक्त अंजली वर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल आणि जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत सन २०२६-२७ या वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या (सर्वसाधारण) ४७० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना ७५ कोटी, एकात्मिक आदिवासी विकासाठी २.९७ अशा एकूण ५४७.९७ कोटी रुपयांचा जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा समितीसमोर सादर करण्यात आला व त्यावर सविस्तर चर्चा करून मान्यता देण्यात आली. बैठकीत मागील तीन वर्षांतील जिल्हा वार्षिक योजनेच्या कामांचा आढावा घेण्यात आला. खासदार कल्याण काळे आणि आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे यांनी मंजूर निधी वेळेत खर्च न झाल्याने तो शासनाकडे परत गेल्याबाबत प्रश्न उपस्थित करत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. यावर पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी रखडलेल्या कामांची संख्या, त्यासंदर्भात करण्यात आलेली कार्यवाही आणि संबंधित कामे कशा पद्धतीने पूर्ण करण्यात येणार आहेत, याबाबत संबंधित विभागांनी सात दिवसांत सविस्तर अहवाल व सादरीकरण सादर करण्याचे निर्देश दिले. सखोल चौकशीनंतर पुढील निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच यापुढे सर्व प्रशासकीय यंत्रणांनी जिल्हा वार्षिक योजनेतील मंजूर कामे विहित मुदतीत पूर्ण करून प्राप्त निधी नियोजित कालावधीत खर्च करण्याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. बैठकीत जाफराबाद, मंठा आणि परतूर येथील दिवाणी न्यायालयांच्या इमारतींमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या प्रस्तावाबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद बांधकाम विभाग, समाजकल्याण विभाग, आरोग्य केंद्रे, रस्ते विकास तसेच लोक प्रतिनिधींच्या मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी निधी मंजुरीसह अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीच्या प्रारंभी पालकमंत्री पंकजा मुंडे, उपस्थित लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित दादा पवार तसेच माजी आमदार दिवंगत सुरेश जेथलिया यांना श्रद्धांजली अर्पण केली. तसेच शेतकऱ्यांसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' आणि वीजबिल सवलतीची घोषणा केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करणारा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या अभिनंदन ठरावाची प्रत मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचविण्याबाबत आवश्यक नियोजन करण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सन २०२६-२७ च्या जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्याचे सादरीकरण केले. बैठकीचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी यांनी केले. बैठकीस जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## || थोडक्यात

### राजर्षी शाहू महाराज पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी शहरातील राजर्षी शाहू महाराज पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्थेची ९ वी सर्वसाधारण सभा रविवारी खेळीमेळीच्या वातावरणामध्ये आणि उत्साहात डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये संपन्न झाली पतसंस्थेचे मार्गदर्शक दिलीप तिजोरे यांनी संस्थेच्या प्रगतीचा व आधुनिक चालू वाटचाल संदर्भात मार्गदर्शन केले तसेच संस्थेचे चेअरमन दिगंबर गाडे यांनी स्वागत प्रस्तावनामध्ये संस्थेस ३१ मार्च २०२६ ला संपलेल्या आर्थिक वर्षात ५८९२०१ निव्वळ नफा झाला आहे असे नमूद केले यावर्षी संस्था सभासदांना ७% टक्के लाभांश देणार असल्याचे त्यांनी जाहीर केले सर्वसाधारण सभा संपल्यानंतर लगेचच सभासदांना डिव्हीडंड देण्यात आला वार्षिक सभेपुढे एकूण १२ विषय होते ते सर्वानुमते मंजूर करण्यात आले तसेच ऐनवेळच्या विषयांमध्ये वर्गणी वाढ बाबतीत प्रश्न उपस्थित केला असता त्यास सर्वानुमते मंजुरी मिळाली पतसंस्थेचे सचिव संपत घारे संचालक अंबादास साठे आत्माराम दहिफळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले यावेळी संचालक ज्ञानेश्वर गायके पवनराव मोरे राजेंद्र चव्हाण दिलीप तिजोरे संदीप उदमले व्यवस्थापक रमेश लाटणे तसेच बहुसंख्येने सभासद उपस्थित होते.

### शासकीय कॉन्ट्रॅक्टर देविदान दरोडा प्रकरणी आरोपी अटक

जालना । प्रतिनिधी

दरोडा व मोक्का गुन्हयातील फरार आरोपी अनिकेत जाधवला अखेर पोलिसांनी पकडले शासकीय कंत्राटदार शैलेश देविदान, रा.श्रीकृष्णनगर, जालना यांच्या राहते घरी सशस्त्र दरोडा टाकण्यात आला होता. त्यानुषंगाने चंदनझिरा पोलीस ठाणे जालना येथे गुरनं. ५४०/२०२५ कलम ३१२ भा.न्यां.स. अन्वये गुन्हा दाखल होता. त्यानंतर सदर गुन्हयाचा तपासामधील आरोपीतांना अटक करण्यात येवुन गुन्हयाच्या कलमांमध्ये कलम १११, ९५ भा.न्या.सं. सह कलम ३, २५ भा.ह.का. सह कलम ३(१) (),३(२), ३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ अन्वये वाढ करुन सदर गुन्हयाचा तपास श्री. अनंत कुलकर्णी , उपविभागीय पोलीस अधिकारी, यांच्याकडे देण्यात आला होता.सदर गुन्हा घडल्यापासुन आरोपी अनिकेत संतोष जाधव, वय २० वर्ष, रा. गुंडप्पा गल्ली डबल जिन जालना हा त्याचे अस्तीत्व लपवुन पळत होता. सदर फरार आरोपींचा शोध घेवुन जेरबंद करणेबाबत मा. पोलीस अधिक्षक श्री. तेगबीर सिंह संधू यांनी पोलीस पथकास सुचना दिल्या होत्या. पथक तयार करुन कारवाई करण्याबाबत मार्गदर्शन केले होते. त्यानुषंगाने दिनांक १८/०७/२०२६ रोजी आरोपी अनिकेत संतोष जाधव याचा शोध घेणेसाठी तांत्रिक विश्लेष्णण व गुप्तबातमीदारामार्फत माहिती मिळवित असतांना माहिती मिळाली की, आरोपी अनिकेत जाधव हा गांधी चमन येथे आला आहे. सदर ठिकाणी तात्काळ पथक रवाना होवुन त्यास ताब्यात घेण्यात आले असुन पुढील तपासकामी तपासी अधिकारी यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. तेगबीर सिंह संधू , मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी , मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग जालना श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने कारवाई केली.

### विवेक घारे यांच्या नियुक्तीने काँग्रेसला नवी ऊर्जा-मा.आ. राठोड

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी विवेक घारे यांची नियुक्ती झाल्याबद्दल मा.आमदार राजेश राठोड यांच्या निवासस्थानी त्यांचा जंगी करण्यात आला. यावेळी माजी आमदार धोंडीराम राठोड यांची उपस्थिती होती. काँग्रेस पक्षाने दिलेल्या जबाबदारीनुसार विवेक घारे हे तालुक्यातील संघटन मजबूत करण्यासाठी काम करतील, असा विश्वास यावेळी राजेश राठोड यांनी व्यक्त केला. पुढे बोलताना ते म्हणाले की, विवेक घारे हे अभ्यासू आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन जाणारे नेतृत्व आहे, मंठा तालुक्यात काँग्रेस पक्ष वाढवण्यासाठी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी ते प्रभावीपणे काम करतील. पक्षाने त्यांच्यावर दाखवलेल्या विश्वासाला ते नक्कीच पात्र ठरतील असे सांगितले. नवनियुक्त अध्यक्ष विवेक घारे यांनी आ. राजेश राठोड आणि पक्षश्रेष्ठीचे आभार मानले.याप्रसंगी तालुका काँग्रेसचे माजी अध्यक्ष निळकंठ वायाळ, बाजार समितीचे संचालक पंजाबराव केंधळे, प्रकाश घुले, अशोक चव्हाण, सुरेश वाव्हळे, नितीन राठोड, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उसात विवाहितेवर अत्याचार गणेश मस्के वर गुन्हा दाखल

## आरोपीला फरार करण्यास मदत करणारा पोलीस कोण?

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील कोरडगाव शिवारातील उसाच्या शेतात महिलेवर जबरदस्तीने अत्याचार बलात्कारासह जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एका युवकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे याबाबत १५ जुलै रोजी पीडित महिला उसाच्या शेतात काम करत असताना आरोपी तेथे आला व महिलेची संवाद साधत तू मला आवडते असे म्हणत महिलेवर जबरदस्ती केल्याचा व सदरील घटना कुणाला सांगितल्यास तुला तुझ्या पतीला आणि कुटुंबीयाला जिवे मारेन अशी धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत केला आहे सदरील पीडित महिलेने दुसऱ्या दिवशी पाथर्डी पोलीस ठाण्यात संबंधित आरोपी विरुद्ध फिर्याद दिल्याने पाथर्डी पोलिसांनी कोरडगाव खंडोबाचीवाडी येथील आरोपी गणेश बाळासाहेब म्हस्के याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे संशयित आरोपी गणेश मस्के हा फरार असून पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे करत आहेत.

आरोपी गणेश मस्के हा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असताना पाथर्डी पोलीस ठाण्यात उपस्थित होता गुन्हा दाखल होण्याची कुणकुण लागतातच आरोपी गणेश मस्के तिथून फरार झाला १७ व १८ जुलै या दिवशीचे सीसीटीव्ही फुटेज जतन करण्याची मागणी व आरोपीला फरार करणारा दुसरा कोणी नसून पोलीसच असल्याचे आरोप फिर्यादी महिलेने केले आहेत आरोपीला फरार होण्यास मदत करणाऱ्या त्या पोलीस कर्मचाऱ्याला निलंबित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# खा. डॉ. कल्याण काळे यांच्या वाढदिवसानिमित्त जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

जालना

खा. डॉ. कल्याण काळे यांच्या वाढदिवसानिमित्त जालना शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने कुंभेफळ येथील वारकरी संप्रदाय शाळेत जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. गरजू लाभार्थ्यांना अन्नधान्य व दैनंदिन वापराच्या आवश्यक वस्तूंचे वितरण करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेंद्र राख, जालना शहर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धनुरे, कृष्णा पडूळ, गणेश गवारे महाराज, राजेंद्र गोरे, अशोक उबाळे, सूरज येळगटवार, रघुवीर गुडे, दिनेश सुराणा, सोपान तिरुखे, माऊली इंगोले, कल्याण पडूळ, दिग्विजय धडघे आणि भरत लोढा यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी




खा. डॉ. कल्याण काळे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविणे हीच त्यांना खरी शुभेच्छा असल्याचे सांगितले. गरजू आणि वंचित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या सामाजिक उपक्रमाचे लाभार्थी आणि नागरिकांनी स्वागत करत आयोजकांचे आभार मानले.ी

# अंबडमध्ये काळ्या बाजारात विक्रीसाठी साठवलेला ६ लाखांचा धान्यसाठा जप्त; एकावर गुन्हा दाखल



जालना । प्रतिनिधी

शासकीय योजने अंतर्गत शालेय पोषण आहारासाठी उपयोगात येणारे गहू व तांदळाचा साठा, काळ्या बाजारात बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने पोलिस व महसूल प्रशासनाने संयुक्त कारवाई करत जप्त केला आहे. या कारवाईत एकूण ६ लाख ३७ हजार ४१८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, गोदाम मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याचे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

याबाबत माहिती अशी की, दि. १६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी पुरवठा व महसूल विभागाला गोपनीय माहिती मिळाली की, चांगले नगर, अंबड येथील एका खाजगी पत्र्याच्या गोदामात बेकायदेशीररित्या धान्याचा साठा करून ठेवला आहे. या माहितीच्या आधारे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय पथकाने पोलीस कर्मचाऱ्यांसह रात्री ७.४५ वाजेच्या सुमारास सदर गोदामावर छापा टाकला.

गोदामाच्या दरवाजाला कुलूप असल्याने आणि मालक शेख नसीर अब्बास बागवान (रा. अंबड) यांच्याशी संपर्क न होऊ शकल्याने, पंचासमक्ष गोदामाचे कुलूप तोडून आत प्रवेश करण्यात आला. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल तपासणी दरम्यान गोदामात कोणताही वैध परवाना किंवा नोंद नसलेला खालील मुद्देमाल मिळून आला यामध्ये गहू १८९ गोण्या (एकूण ९४.५० क्विंटल) किंमत अंदाजे रु. २ लाख ९७ हजार ७०२ तर तांदूळ १५२ गोण्या (एकूण ७६ क्विंटल) किंमत अंदाजे रु. ३ लाख ३३ हजार ७१६ इतर साहित्य मध्ये शासकीय धान्य वितरणासाठी वापरली जाणारी ८० रिकामी पोती आणि ६ हजार ५००रुपये किमतीचा एक इलेक्ट्रॉनिक वजन काटा असा एकूण रु. ६ लाख ३७ हजार ४१८ मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास याप्रकरणी तहसील कार्यालय अंबड येथील निरीक्षण अधिकारी किरणकुमार शत्रुघ्न खांडेभराड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी शेख नसीर अब्बास बागवान याच्याविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३ आणि ७ अन्वये गुन्हा (रजि. नं. ०५२८/२०२६) दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भगवान नरोडे करत असल्याचे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# चोरी करणारे ३ आरोपी तर चोरीचा माल विकत घेणारे २ भंगार विक्रेते अटक

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हयातील चोरी व घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस अधिक्षक श्री. तेगबीर सिंह संधू यांनी पोलीस पथकाला आरोपी पकडून आणण्यासंदर्भात आदेश केले होते. राजुर ते भोकरदन जाणाऱ्या रोडवरील राजुरेश्वर जिनींगमधील स्टोअरमधुन ७५ लोखंडी वेट गड्डू अज्ञात चोरटयाने चोरुन नेले वगैरे मजकुराचे फिर्यादी वरुन पोलीस ठाणे हसनाबाद, जालना गुरनं. १९७/२०२६ कलम ३०३(२), ३३४(१) भान्यास प्रमाणे दाखल झाला होता.

सदर गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेत असतांना मिळालेल्या माहितीचे तांत्रिक विश्लेषण व गुप्तबातमीदाराच्या मदतीने माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा आरोपी शाम विष्णु सन्यासी, वय-३५ वर्ष, रा. सुंदरनगर, चंदनझिरा, जालना २) लहु धोंडीराम पवार, वय-४० वर्ष, रा.सुंदरनगर, चंदनझिरा जालना ३) सय्यद अफरोज सय्यद हसन, वय-३५ वर्ष, रा. बावला पार्क, चंदनझिरा, जालना यांनी केला आहे. त्यानुषंगाने त्यांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी गुन्हयाची कबुली देवून गुन्हयातील मुददेमाल आरोपीतांनी भंगार विक्रेते ५) अन्बर खान गफुर खान, वय-४० वर्ष, रा. टड्डुपुरा, जालना ६) शेख नासेर शेख लतीफ, वय-३८ वर्ष, रा.दुःखीनगर, जुना जालना यांना विक्री केल्याचे सांगितले.

# डॉक्टरांवरील हल्ला प्रकरणी वैधकीय क्षेत्राचा आज २४ तास वैधकीय सेवा बंद

जालना । प्रतिनिधी

आयएमए महाराष्ट्र राज्य शाखेच्या हाकेला जालन्याचा पूर्ण पाठिंबा अत्यावश्यक सेवा वगळता सर्व ओपीडी आणि रुग्णालये राहणार कुलूपबंद डोंबिवलीतील शास्त्रीनगर महानगरपालिका रुग्णालयात डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांवर झालेल्या अत्यंत क्रूर आणि अमानुष हल्ल्याचे पडसाद आता संपूर्ण महाराष्ट्रात उमटू लागले आहेत. या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध नोंदवण्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्याने येत्या २० जुलै रोजी सकाळी ६ वाजल्यापासून ते २१ जुलै रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत संपूर्ण २४ तासांच्या आरोग्य सेवा बंद ची घोषणा केली आहे. या राज्यव्यापी आंदोलनाला आयएमए जालना शाखेने आपला आक्रमक आणि पूर्ण पाठिंबा जाहीर केला असून जिल्ह्यातील सर्व डॉक्टरांना या आंदोलनात सक्रिय उतरण्याचे आवाहन केले आहे.

आयएमए जालना शाखेने जारी केलेल्या अधिकृत परिपत्रकानुसार २० जुलै रोजी जिल्ह्यातील सर्व खाजगी व नियमित बाह्यरुग्ण विभाग आणि पूर्वनियोजित वैद्यकीय सेवा पूर्णपणे बंद ठेवल्या जातील. आंदोलन आक्रमक असले तरी रुग्णांची गैरसोय होऊ नये आणि मानवता जपली जावी यासाठी आपत्कालीन आणि जीव वाचवणाऱ्या अत्यावश्यक सेवा मात्र पूर्ववत सुरू राहणार आहेत. कोणत्याही रुग्णाचा जीव धोक्यात येऊ नये याची पूर्ण काळजी संघटनेकडून घेतली जात आहे. तसेच रुग्णांना कोणताही मनस्ताप होऊ नये म्हणून या तात्पुरत्या बंदची पूर्वकल्पना देण्याच्या सूचनाही डॉक्टरांना देण्यात आल्या आहेत. डॉक्टरांवर होणारे हल्ले आता सहन केले जाणार नाहीत वैद्यकीय क्षेत्रात सध्या भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण आहे. डॉक्टरांना सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यक्षेत्र मिळावे यासाठी शासनाने आता तात्काळ कठोर कायदे आणि पावले उचलावीत हीच आमची मुख्य मागणी आहे. आयएमए जालना शाखेचे अध्यक्ष डॉ. बळीराम बागल आणि सचिव डॉ. प्रल्हाद धारुरकर यांनी संयुक्त पत्रकाद्वारे सर्व वैद्यकीय व्यावसायिक आणि सदस्यांना या शांततापूर्ण आंदोलनात १००% सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. डॉक्टरांच्या सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आला असून संपूर्ण वैद्यकीय क्षेत्र या अन्यायाविरोधात एकवटले आहे. या आंदोलनासंदर्भातील पुढील रणनीती आणि सूचना लवकरच जाहीर केल्या जातील असेही संघटनेतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. आता चेंडू शासनाच्या कोर्टात असून डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी सरकार काय पावले उचलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले.

# रक्तदान हेच आपल्या नेत्याला सर्वोत्तम-भास्कर दानवे

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे यशस्वी मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे राज्यभर राबविण्यात येणाऱ्या 'महाराजस्व अभियान' व 'महारक्तदान शिबिर' या उपक्रमांच्या नियोजनासाठी भारतीय जनता पार्टी जालना महानगर व ग्रामीण जिल्ह्याची संयुक्त बैठक संपन्न झाली. आगामी कार्यक्रमांची यशस्वी अंमलबजावणी, रक्तदान शिबिराचे नियोजन, तसेच कार्यकर्त्यांचा सहभाग याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जालना जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्धार करण्यात आला. रक्तदानासारख्या जीवनदायी कार्यातून



समाजाप्रती आपली बांधिलकी जपत अधिकाधिक नागरिकांना या अभियानात सहभागी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर पाटील भांदरगे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आ.नारायण कुचे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, भारतीय जनता पार्टी ही केवळ राजकीय पक्ष नसून समाजसेवेचे व्रत जोपासणारी संघटना आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेले महाराजस्व अभियान व महारक्तदान शिबिर हे जनकल्याणाच्या भावनेतून राबविण्यात येणारे उपक्रम आहेत. प्रत्येक मंडळ, प्रत्येक शक्तिकेंद्र आणि प्रत्येक बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी करावा. जास्तीत जास्त रक्तसंकलन आणि नागरिकांचा व्यापक सहभाग हेच आपल्या कार्याचे यश ठरेल.यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासाला नवी दिशा मिळाली आहे. महारक्तदान शिबिराच्या माध्यमातून रक्तदात्यांना जोडण्याचे तसेच महाराजस्व अभियानाद्वारे शासनाच्या योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने ही जबाबदारी स्वतःची समजून पूर्ण ताकदीने कामाला लागावे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त होणारे सर्व कार्यक्रम जिल्ह्यात भव्य आणि यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीस भारतीय जनता पार्टी जालना महानगर व ग्रामीण जिल्ह्यातील पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, मोर्चा व आघाडीचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
सोमवार दि.२० जुलै २०२६ | ६

# ना.पंकजा मुंडेंचा सर्वसमावेशक जिल्हा दौरा; प्रत्येक घटकातील जाणून घेतल्या व्यथा

## जनता दरबार ठरला सर्वसामान्यांसाठी उपयुक्त

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा नुकताच पार पडलेला बीड जिल्हा दौरा हा केवळ शासकीय कार्यक्रमांपुरता मर्यादित न राहता जनतेच्या सुख-दुःखाशी नाळ जोडणारा आणि सर्वसामान्यांच्या अपेक्षांना प्रतिसाद देणारा ठरला. सर्वसमावेशक घटकांच्या प्रश्नांची सोडवणूक , विकासकामांचा आढावा, शासकीय बैठका, विविध उद्घाटने आणि नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटीगाठी यांमुळे हा दौरा जिल्हाभर चर्चेचा विषय ठरला.

या दौऱ्यादरम्यान पंकजाताईंनी गेवराई, बीड, परळी, अंबाजोगाई, केज, माजलगाव आदी भागांना भेट देत विकासकामांचा वेग वाढविण्यावर भर दिला. विविध शासकीय विभागांच्या बैठका घेऊन प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याबाबत अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या. विशेष म्हणजे, प्रत्येक ठिकाणी त्यांनी कार्यकर्ते, शेतकरी, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, उद्योजक आणि विविध समाजघटकांशी थेट संवाद साधला. नागरिकांनी मांडलेल्या समस्या ऐकून त्यांच्या निराकरणासाठी जागेवरच निपटारा केला. त्याचप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याने अनेकांना दिलासा मिळाला.पंकजाताई मुंडे यांच्या दौऱ्यात औपचारिकतेपेक्षा जनसंपर्काला अधिक महत्त्व दिल्याचे चित्र पाहायला मिळाले. दिवसभराच्या व्यस्त कार्यक्रमानंतरही त्यांनी कार्यकर्ते आणि नागरिकांसाठी स्वतंत्र वेळ राखून ठेवत प्रत्येकाशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या भेटीसाठी आलेल्या नागरिकांमध्ये समाधानाची भावना दिसून आली.

या दौऱ्यात विविध विकासकामांचे उद्घाटन, शासकीय योजनांचा आढावा आणि स्थानिक प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची भूमिका यामुळे विकासाभिमुख



नेतृत्वाची छाप अधिक ठळक झाली. सर्व समाजघटकांशी साधलेला थेट संवाद, लोकांच्या अडचणी समजून घेण्याची संवेदनशीलता आणि विकासाच्या कामांना दिलेली गती यामुळे पंकजाताई मुंडे यांचा हा बीड जिल्हा दौरा जनतेच्या अपेक्षांना न्याय देणारा आणि लोकाभिमुख नेतृत्वाचा प्रभावी नमुना ठरल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

### जनता दरबाराची छाप

ना. पंकजाताई कुठेही असोत जनतेला भेटल्याशिवाय एकही दिवस जात नाही. दौऱ्यात परळी व अंबाजोगाईत झालेला जनता दरबार जिल्ह्यात चर्चेचा ठरला. या जनता दरबारात सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती. रस्ते, पाणीपुरवठा, वीज वितरण, महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे आणि वैयक्तिक लाभाच्या योजना अशा विविध समस्या घेऊन नागरिक आले होते. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केवळ अर्ज स्वीकारले नाहीत, तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना लगेच फोन करून जागेवर प्रश्नांचा निपटारा केला. लगेच तोडगा काढून फोन करतात, त्यांची ही शैली पाहून आपल्या समस्यांची गाऱ्हाणी घेऊन आलेल्या जनतेच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव उमटत होते.

### चौफेर लक्ष अन प्रत्येक समाज घटकाची काळजी

पंकजाताई मुंडे यांचा दौरा बीड जिल्ह्यामध्ये सकारात्मक ऊर्जा नेहमीच निर्माण करतो. त्याच पद्धतीने हा दौराही एक रचनात्मक व सकारात्मक ऊर्जा देणारा ठरला. वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास योजना आराखडा कार्यान्वित करण्याबाबत त्यांनी निर्देश दिले. त्याच पद्धतीने विकासाच्या दृष्टीने त्यांनी बारकाईने लक्ष घालत प्रशासनाला निर्देश दिले. बीड जिल्ह्यातील सुखदुःखाच्या सर्व घटना, घडामोडीमध्ये सहभागी होत, माझे सर्वांवर लक्ष आहे असाच खऱ्या अर्थाने त्यांनी जनतेला आश्वासक असा धीर दिला.

# २४ कोटींच्या 'माता व बाल' रुग्णालयात अवघ्या १० दिवसांतच वॉटर फिल्टर बंद!



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयातील खाटांची कमतरता आणि रुग्णांची गैरसोय लक्षात घेऊन तब्बल २४ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले १०० खाटांचे 'माता व बाल रुग्णालय' दि. ९ जुलै रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतिशकुमार सोळंके आणि अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागेश चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन करून रुग्णसेवेसाठी सुरू करण्यात आले. मात्र उद्घाटनानंतर अवघ्या १० दिवसांतच येथील मूलभूत सुविधांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले



आहे.

रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी इमारतीच्या प्रत्येक मजल्यावरील प्रतीक्षागृहात वॉटर फिल्टर बसविण्यात आले आहेत. मात्र हे वॉटर फिल्टर सध्या बंद अवस्थेत असल्याने रुग्ण व नातेवाईकांना पिण्याच्या पाण्यासाठी बाहेरून बाटलीबंद पाणी खरेदी करण्याची वेळ येत आहे. त्यामुळे आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत असल्याची तक्रार होत आहे.

कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या नव्या रुग्णालयात उद्घाटनानंतर अवघ्या १० दिवसांतच पिण्याच्या पाण्याची सुविधा ठप्प होणे ही गंभीर बाब असून, संपूर्ण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी व्यक्त केली.

उद्घाटनापूर्वी ◄◄ पान ३ वर

# नीट परीक्षेत आष्टीच्या श्रावणी पोकळेचा लातूरच्या शाहू महाविद्यालयात डंका

## ६५० गुणांसह मुलींमध्ये प्रथम; एम्समध्ये प्रवेश निश्चित

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील प्राथमिक शिक्षक संतोष पोकळे व शैला पोकळे यांची कन्या कु. श्रावणी संतोष पोकळे हिने छएएढ-णऋ २०२६ परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात उल्लेखनीय यश संपादन करत लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात मुलींमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. श्रावणीने ७२० पैकी तब्बल ६५० गुण मिळवत आपल्या गुणवत्तेची



छाप पाडली असून, तिच्या या यशामुळे आष्टी तालुक्यासह संपूर्ण परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

श्रावणी पोकळे हिने इयत्ता पाचवी पासूनच विविध स्पर्धा परीक्षेत यश संपादन करत चुणूक दाखवली होती.त्याच धर्तीवर तिने नीट परीक्षेतही ६५० गुण मिळवत भारतातील उच्च समजल्या जाणाऱ्या एम्ससाठी प्रवेश निश्चित केला आहे.वसुंधरा माध्यमिक विद्यालयाची माजी विद्यार्थिनी असलेल्या ◄◄ पान ३ वर

# मोठेवाडीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा बूथ संपर्क दौरा उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने दि १९ जुलै रविवार रोजी बूथ संपर्क दौरा व कार्यकर्त्यांची बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.या बैठकीस पक्षाचे नेते मोहन जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत बूथस्तरावरील संघटन अधिक सक्षम करणे, प्रत्येक मतदारापर्यंत पक्षाची भूमिका पोहोचविणे, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटन विस्तार, नव्या कार्यकर्त्यांचा सहभाग, मतदारांशी सातत्याने




**कार्यकर्त्यांच्या बैठकीला मोहन जगताप यांची प्रमुख उपस्थिती; शिवसेनेत गेलेल्या कार्यकर्त्यांची घरवापसी**

संपर्क आणि बूथनिहाय नियोजन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी नुकतेच शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश केलेले शिवकुमार माने सरपंच, सुरुमगाव आणि अंगद खेत्री उपसरपंच, मोठेवाडी यांनी घरवापसी करत पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) मध्ये जाहीर प्रवेश केला.मोहन जगताप यांच्या हस्ते त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यांच्या पुनर्प्रवेशामुळे परिसरातील पक्ष संघटनेला निश्चितच बळ मिळेल, अशी भावना उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

यावेळी बूथ लेव्हल एजंट (बि एल.ओ.) म्हणून पांडुरंग गोंडे, प्रभाकर खेत्री आणि दत्तात्रय चव्हाण यांची निवड करण्यात आली. मोहन जगताप यांच्या हस्ते तिघांनाही नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. बूथस्तरावरील संघटना अधिक सक्षम करून

# राष्ट्रवादी काँग्रेसचे आज धरणे आंदोलन!

## सुरक्षित भवितव्यासाठी विद्यार्थ्यांनी धरणे आंदोलनात बहुसंख्येने सहभागी व्हावे – सतीश शिंदे

बीड । प्रतिनिधी

देशभरातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याशी संबंधित प्रश्न, परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता आणि करीयर साठी मेहनत घेणाऱ्या प्रत्येक युवकांना न्याय मिळावा या प्रमुख मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आज २० जुलै रोजी बीड येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले असून, विद्यार्थी, पालक, युवक आणि सुजाण नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र



पवार युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश शिंदे यांनी केले आहे.

शिक्षण व्यवस्था ही देशाच्या भवितव्याचा पाया आहे. मात्र, परीक्षा प्रक्रियेत सातत्याने घडणारे गैरप्रकार, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होणारा खेळ आणि जबाबदार यंत्रणांकडून होणारे दुर्लक्ष यामुळे लाखो विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांच्या कष्टाला न्याय, पारदर्शक परीक्षा व्यवस्था आणि सुरक्षित शैक्षणिक वातावरण मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार असून, त्यासाठी लोकशाही मार्गाने आवाज उठविणे ही काळाची गरज आहे.

या धरणे आंदोलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यां कडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जाणार जाणार आहे. विद्यार्थी आणि युवकांनी आपल्या हक्कांसाठी एकजूट दाखवत शांततापूर्ण आंदोलनात सहभागी व्हावे.

आजचा संघर्ष हा केवळ एका परीक्षेचा नसून, देशातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या सुरक्षित भवितव्याचा आहे. ◄◄ पान ३ वर

# छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा परवानगीशिवाय उभारल्याची तक्रार; ८ शिवप्रेमींची जामीन मंजूर

## ॲड. आर. एस. खुणे यांच्या युक्तिवादानंतर न्यायालयाचा दिलासा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील बहुचर्चित गोळेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पूर्णाकृती पुतळा शासनाची आवश्यक परवानगी न घेता सार्वजनिक व शासकीय जागेवर उभारण्यात आला. व त्यामुळे ८ अज्ञात शिवप्रेमीवर तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ११३/२०२६ दाखल करण्यात आला होता.ग्रामपंचायत अधिकारी अयोध्या रंगनाथ शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, गोळेगाव येथील मुख्य चौकात सार्वजनिक जागेवर काही व्यक्तींनी कोणतीही शासकीय परवानगी न घेता छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारला. संबंधित जागा शासकीय व सार्वजनिक स्वरूपाची असून तेथे अनाधिकृत अतिक्रमण करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच या उभारणीमुळे सार्वजनिक रहदारीस अडथळा निर्माण झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी पोलिसांनी तपास करून अनिल प्रकाश काळे, परमेश्वर पंडित काळे, सचिन सुग्रीव काळे, केशव कडाजी ◄◄ पान ३ वर

# धनंजय मुंडे आज परळीत घेणार आढावा

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघासह राज्यात सर्वत्र मतदार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण डखठ अभियान सुरू असून परळी विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या कामाचा माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे सविस्तर आढावा घेणार आहेत.

ही आढावा बैठक शहरातील विशेष अतिथी विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आली असून, सकाळी १० ते १ परळी वैद्यनाथ शहर तर २ ते ५ दरम्यान ग्रामीण मतदारसंघाचा आढावा घेऊन श्री मुंडे योग्य सूचना करतील. या बैठकीसाठी सर्व संबंधित अधिकारी, इङज तसेच इङ- यांसह सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी अद्ययावत माहितीसह उपस्थित राहण्याचे आवाहन धनंजय मुंडे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मोकाट जनावरे आणि वराहांचा हैदोस; पेरणीनंतर शेतकऱ्यांवर संकट - कारवाई न झाल्यास नगरपंचायतीसमोर धरणे आंदोलनाचा इशारा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील प्रभाग क्रमांक १५ व १६ लगत असलेल्या शेतशिवारात मोकाट जनावरे आणि वराहांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकरी अक्षरशः हतबल झाले आहेत. नुकत्याच झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरणी केली असतानाच ही मोकाट जनावरे शेतात घुसून कोवळ्या पिकांची मोठ्या प्रमाणावर नासधूस करत आहेत. दुसरीकडे वराहांकडून ◄◄ पान ३ वर



# न्यायालयाकडून इंडियन मेडिकल असोसिएशनच्या तीव्र भावनांची दखल

## आरोपी नगरसेवक रमेश म्हात्रेचा अंतरीम जामीन रद्द राज्य पदाधिकारी डॉ.राजेश इंगोले यांची माहिती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सरकारी रूग्णालयात एका महिला डॉक्टरसह दोन डॉक्टरांना व पारिचारकांना रमेश म्हात्रे नामक शिंदे सेनेच्या नगरसेवकाने मारहाण केल्यामुळे महाराष्ट्रातील सर्व डॉक्टरच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला. डॉक्टरांची संघटना असणाऱ्या इंडियन मेडिकल असोसिएशनने याविरूद्ध दंड थोपटत मारकुट्या नगरसेवक रमेश म्हात्रे सह इतर चार जणांवर कडक कायदेशीर कार्यवाही करावी याकरीता तीव्र निषेध व्यक्त करीत राज्यव्यापी आंदोलनाला सुरूवात केली होती. यातच दंडाधिकारी यांनी आरोपी नगरसेवक रमेश म्हात्रे यांच्या प्रकृती अस्वास्थ्याचे कारण समोर देत अनेक त्रुटी पूर्ण कार्यवाही करीत जामीन दिला होता. या जामीनामुळे महाराष्ट्रात सर्वत्र डॉक्टरांमध्ये तीव्र असंतोष पसरला व इंडियन मेडिकल असोसिएशनने आयुर्वेद असोसिएशन डेंटल असोसिएशन होमिओपॅथी असोसिएशन नर्सिंग असोसिएशन यांच्या साह्याने महाराष्ट्रात उद्या सोमवारी २० जुलै २०२६ रोजी लाक्षणिक स्वरूपाचा बंद पुकारला होता. डॉक्टरांच्या या तीव्र भावनांचा उद्रेक व तीव्रता लक्षात घेता माननीय न्यायालयाने स्वतःच आरोपी नगरसेवक रमेश म्हात्रे विरूद्ध सुमोटो याचिका दाखल करून दंडाधिकाऱ्यांच्या त्रुटींपूर्ण



जामिनावर बोट ठेवत सदरील जामीन नामंजूर करीत त्याला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश प्रशासनाला दिले. रमेश म्हात्रे पोलिसांना शरण न आल्यास त्याच्या मालमत्ता जप्तीचे ही आदेश न्यायालयाने दिले आहेत.

देशाच्या इतिहासात प्रथमच डॉक्टरांच्या सुरक्षेबाबत माननीय न्यायालयाने गंभीर दखल घेत स्वतःहून ही सुमोटो याचिका दाखल करीत न्यायालय डॉक्टरांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत न्यायालय डॉक्टरांच्या मागे खंबीरपणे उभे आहे हे या याचीकेतून स्पष्ट केले. ही सुमोटो याचिका दाखल करत असताना माननीय न्यायालयाने इंडियन मेडिकल असोसिएशनच्या राज्य पदाधिकाऱ्यांना सोमवारी होणारा संप करू नये व रूग्णांच्या आरोग्याला प्राधान्य द्यावे अशी विनंती केली. न्यायालयाच्या या विनंतीचा मान राखत इंडियन मेडिकल असोसिएशनने उद्या सोमवारी होणारा एक दिवसाचा लाक्षणिक संप पुढे ढकलला आहे. मात्र डॉक्टरांच्या सुरक्षितते विषयी सरकारने धोरणात्मक नियम तयार करून सध्या अस्तित्वात असलेला मेडिकेअर कायदा आणखीन कडकपणे राबवून डॉक्टरांना निर्भय




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26